सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०४ जुलै २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ९२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बेदरकार गाडी चालवणाऱ्यांना विमा भरपाई नाही : सर्वोच्च न्यायालय



## स्वतःच्या चुकीमुळे झालेल्या अपघातात मृत्यू झाल्यास कुटुंबीयांना भरपाई मिळणार नाही

नवी दिल्ली : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने वाहन चालवणाऱ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे जो भविष्यकाळात रस्त्यावरील वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी प्रेरणा देणारा ठरू शकतो. न्यायालयाने स्पष्ट केले आहे की बेफिकीरपणे आणि वेगाने वाहन चालवणाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्यास विमा कंपनी त्यांच्या कुटुंबीयांना भरपाई देण्यास बाध्य नाही.

हा निर्णय एन.एस. रवीश यांच्याशी संबंधित प्रकरणावर आधारित आहे. १८ जून २०१४ रोजी घडलेल्या या दुर्घटनेची सुरुवात तेव्हा झाली जेव्हा रवीश हे त्यांच्या वडील, बहीण आणि मुलांसह कारने प्रवास करत होते. मालनहल्लीजवळ त्यांच्या गाडीवरील नियंत्रण सुटले आणि भीषण अपघात झाला.

या अपघातामागील कारणे तपासताना असे स्पष्ट झाले की रवीश हे अत्याधिक वेगाने आणि बेपर्वाईने गाडी चालवत होते. त्यांच्या या निष्काळजीपणामुळेच हा अपघात घडला आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांच्या तपासणीतही ही बाब स्पष्ट झाली होती.

रवीश यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, मुलगा आणि पालकांनी विमा कंपनीकडे ८० लाख रुपयांची भरपाई मागितली होती. परंतु पोलिसांच्या आरोप पत्रात रवीश यांनाच या अपघातासाठी थेट जबाबदार ठरवण्यात आले होते. या आधारावर मोटार अपघात दावा न्यायाधिकरणाने (एमएसीटी) त्यांचा दावा फेटाळून लावला. या निर्णयावर असमाधानी असलेल्या कुटुंबीयांनी कर्नाटक उच्च न्यायालयात अपील दाखल केले. त्यांनी आपला युक्तिवाद बदलत असा दावा केला की अपघात टायर फुटल्यामुळे झाला होता, रवीश यांच्या चुकीमुळे नाही. परंतु उच्च न्यायालयाने या दाव्याला फारसे महत्त्व दिले नाही.

उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, सर्व पुराव्यांचे परीक्षण करता मृत व्यक्ती त्यांच्या निष्काळजीपणामुळेच अपघाताला कारणीभूत ठरली होती. त्यामुळे विमा कंपनी भरपाई देण्यास बाध्य नाही, असा निर्णय त्यांनी दिला.

अंतिम उपाय म्हणून कुटुंबीयांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने या संपूर्ण प्रकरणाचा सखोल अभ्यास केला. सर्व पुराव्यांचे आणि कायदेशीर मुद्द्यांचे परीक्षण करून त्यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मान्यता दिली.

सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केले, जेव्हा अपघात मृत व्यक्तीच्या स्वतःच्या निष्काळजीपणामुळे होतो, तेव्हा विमा कंपनीवर कोणतीही भरपाईची जबाबदारी राहात नाही. हा निर्णय कायदेशीर तत्त्वावर आधारित आहे की कोणीही व्यक्ती स्वतःच्या चुकीचा फायदा घेऊ शकत नाही.

या निर्णयाचे व्यापक परिणाम दिसून येण्याची शक्यता आहे. यामुळे वाहनचालकांना अधिक जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वाहन चालवण्यासाठी प्रेरणा मिळेल. रस्त्यावरील वेगवान आणि बेपर्वाह गाडी चालवणे हे केवळ स्वतःच्या जीवाला धोका नसून कुटुंबीयांच्या आर्थिक सुरक्षेलाही धोका आहे हे या निर्णयामुळे स्पष्ट झाले आहे.

विमा कंपन्यांसाठी देखील हा निर्णय महत्त्वाचा आहे. यामुळे त्यांना अनावश्यक भरपाई देण्यापासून संरक्षण मिळेल आणि विमा दाव्यांबाबत स्पष्टता निर्माण होईल. तथापि, याचा अर्थ असा नाही की सर्व विमा दावे नाकारले जातील, फक्त निष्काळजीपणामुळे झालेल्या अपघातांमध्ये हा नियम लागू होईल.

या निर्णयामुळे भविष्यकाळात वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी लोकांना अधिक प्रेरणा मिळेल आणि रस्त्यावरील सुरक्षिततेत सुधारणा होण्याची शक्यता आहे.

# सैन्याला मिळणार १.०३ लाख कोटींची क्षेपणास्त्रे आणि वाहने



नवी दिल्ली : भारताच्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने १.०३ लाख कोटी रुपयांची शस्त्रे आणि लष्करी उपकरणे खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. यात भूदल, नौदल आणि हवाई दलासाठी आर्मर्ड रिकव्हरी व्हेईकल्स, इलेक्ट्रॉनिक वॉरफेअर सिस्टीम, जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रे यांचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संरक्षण अधिग्रहण परिषदेने १० संरक्षण साहित्य खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी दिली. देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला प्रोत्साहन देणे आणि भारतीय सैन्य दलांना कोणत्याही आव्हानाला सामोरे जाण्यासाठी कायम सुसज्ज ठेवणे या उद्देशाने ही खरेदी होणार आहे. या खरेदीमुळे शत्रूचा वेगाने आणि प्रभावीरित्या प्रतिकार करण्याची भारतीय सैन्याची क्षमता आणखी वाढणार आहे. भारताचे हवाई संरक्षण आणखी मजबूत होणार आहे. संरक्षण साहित्य निर्मिती ते सैन्याला होणारा पुरवठा यासाठीच्या साखळीचे व्यवस्थापन आणखी प्रभावीरित्या होणार आहे.

सैन्यासाठी खरेदी केल्या जाणार असलेल्या संरक्षण साहित्यात पाणसुरुंग शोधून निकामी करणारे जहाज, अत्याधुनिक शस्त्रे, पाण्याखाली प्रभावी काम करणाऱ्या यांत्रिक बोटी, उंचावर शस्त्र ठेवून वेगाने गोळीबार करण्यासाठी आवश्यक साहित्य अशा अनेक आधुनिक संरक्षण साहित्यांचाही समावेश आहे. यामुळे नौदलाच्या जहाजांचे तसेच व्यावसायिक जहाजांचे रक्षण करण्यास मदत होणार आहे.

# दलाई लामांचा उत्तराधिकारी ठरवण्याचा अधिकार केवळ तिबेटी परंपरेलाचः किरेन रिजिजू

नवी दिल्ली: दलाई लामा यांच्या उत्तराधिकारी निवडीत चीनने अडथळे निर्माण करण्याचा पवित्रा घेतला आहे. तिबेटी बौद्ध धार्मिक नेते, १४ वे दलाई लामा यांनी जेव्हापासून पुढील दलाई लामाची घोषणा त्यांच्या हयातीतही होऊ शकते अशी घोषणा केली तेव्हापासून चीन अस्वस्थ झाला आहे. दलाई लामा यांच्या उत्तराधिकारीसाठी चीनची मान्यता घ्यावी लागेल, असा चीन आग्रह धरत आहे. ज्यावर आता भारत सरकारनेही आपली प्रतिक्रिया दिली आहे.

भारताने ठामपणे स्पष्ट केले आहे की, उत्तराधिकारी निवडीचा निर्णय केवळ दलाई लामा आणि त्यांच्या धार्मिक परंपरेनुसारच घेतला जाईल. कोणत्याही तृतीय पक्षाला, मग तो देश असो वा संस्था, या निर्णयात हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

दलाई लामाच्या उत्तराधिकारावरून वाद

६ जुलै रोजी तिबेटी बौद्ध धार्मिक नेते दलाई लामा ९० वर्षांचे होतील, त्यामुळे त्यांच्या उत्तराधिकारावरून सुरू असलेला वाद हा पुन्हा एकदा चर्चेचा विषय बनला आहे. ज्यामध्ये चीन हस्तक्षेप करू लागला आहे. दलाई लामा यांच्या भावी उत्तराधिकारी घोषणेसाठी चीनची मान्यता असायला हवी, असे म्हणत चीन नाक खुपसू पाहत आहे. या पार्श्वभूमीवर, भारताचे केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी चीनच्या हस्तक्षेपाच्या प्रयत्नावर टीका केली आहे.

...अधिकार कोणत्याही देशाला नाही

किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे की दलाई लामा यांचे पद सर्वात महत्वाचे आहे. हे पद केवळ तिबेटी लोकांसाठीच नाही तर सर्व बौद्ध उपासकांसाठी महत्त्वाचे आहे. दलाई लामांव्यतिरिक्त इतर कोणालाही दलाई लामांचा उत्तराधिकारी ठरवण्याचा अधिकार नाही. दलाई लामांनी बुधवारी केलेल्या वक्तव्यातही या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका घेतली. त्यांनी सांगितले की, त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचा निर्णय घेण्याचा एकमेव अधिकृत हक्क त्यांच्या 'गाडेन फोडरंग ट्रस्ट'कडेच आहे. चीनने मांडलेल्या उत्तराधिकारी मान्यतेच्या दाव्याला पूर्णपणे फेटाळत त्यांनी ही भूमिका मांडली. चीनकडून करण्यात आलेल्या दाव्याचे खंडन करताना भारताने पुन्हा एकदा तिबेटी बौद्ध परंपरेचा आदर करण्याची आपली वचनबद्धता अधोरेखित केली आहे. कोणताही देश अगदी चीनसुद्धा दलाई लामांचा उत्तराधिकारी कोण असेल हे ठरवू शकत नाही, असे ठाम मत रिजिजू यांनी व्यक्त केले. देशभरातील बौद्ध अनुयायी दलाई लामांच्या शिकवणी आणि धार्मिक परंपरांचे आजही निष्ठेने पालन करतात, असेही रिजिजू यांनी सांगितले.

# ब्रिटिश रॉयल नेव्हीचे बंद पडलेले F35 B लढाऊ विमान, भारतातून तुकडे करुन परत पाठवणार

## केरळमध्ये अडकलेल्या लढाऊ विमानाची अखेर दुरुस्ती झालीच नाही, शेवटी तुकड्यांमध्ये ब्रिटनला जाणार



केरळ: प्रिन्स ऑफ वेल्स कॅरियर स्ट्राइक ग्रुपचा भाग असलेले एफ-३५बी हे बंद पडलेलं लढाऊ विमान गेली कित्येक दिवस भारतात पडून आहे. केरळच्या किनाऱ्यापासून सुमारे १०० नॉटिकल मैल अंतरावर हे विमान कार्यरत असताना, खराब हवामान आणि कमी इंधनामुळे त्याला भारतातील तिरुवनंतपुरम विमानतळावर आपत्कालीन परिस्थितीत उतरवावे लागले होते. तेव्हापासून हे विमान जागचे काही हललेच नाही. विमानातील बिघाड दुरुस्त करण्याचे अनेक प्रयत्न अयशस्वी ठरले असून, आता हे विमान तुकड्यांमध्ये ब्रिटनला परत नेले जाईल. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ते अमेरिकन बनावटीचे अत्यंत महागडे विमान होते, जे पुन्हा दुरुस्त न झाल्याने त्याचे तुकडे करून पाठवले जाणार आहेत!

अमेरिकन बनावटीचे ब्रिटनने खरेदी केलेले हे विमान अत्यंत महाग असल्याचं म्हंटलं जातं. सध्या हे विमान, सीआयएसएफ सुरक्षेखाली तिरुवनंतपुरम विमानतळाच्या बे-४ मध्ये उभे करण्यात आले आहे. सुरुवातीला, केरळमध्ये पावसाळा असूनही, रॉयल नेव्हीने एअर इंडियाचा जेट हँगरमध्ये हलवण्याचा प्रस्ताव नाकारला होता. नंतर, ब्रिटिश नौदलाने जेट हँगरमध्ये हलवण्यास सहमती दर्शविली.

ब्रिटिश रॉयल नेव्हीच्या एफ-३५ लढाऊ विमानाने १४ जून रोजी केरळमधील तिरुवनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानळावर आपत्कालीन लँडिंग केले. मात्र १९ दिवसांनंतरही या विमानातील बिघाड दुरुस्त करता आलेला नाही. त्यामुळे नाईलाजास्तव लष्करी मालवाहू विमानाद्वारे हे लढाऊ विमान तुकड्यांमध्ये ब्रिटनला परत नेले जाणार आहे.

भारतीय हवाई दलाने या विमानाच्या सुरक्षित लँडिंगमध्ये सर्वतोपरी मदत केली. त्यात इंधन भरले आणि रसद देखील पुरवली. मात्र, जेव्हा हे लढाऊ विमान त्याच्या विमानवाहू जहाजात परत जाण्याच्या तयारीत होते, तेव्हा प्री-टेक ऑफ तपासणी दरम्यान हायड्रॉलिक बिघाड आढळून आला. ही समस्या गंभीर मानली जात आहे. कारण त्यामुळे जेटच्या सुरक्षितपणे उड्डाण आणि उतरण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. तीन तंत्रज्ञांचा समावेश असलेल्या रॉयल नेव्हीच्या एका लहान टीमने बिघाड दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला परंतु समस्येच्या गुंतागुंतीमुळे ते अयशस्वी झाले.

केरळमध्ये विमान दुरुस्त करण्याचे अनेक प्रयत्न करूनही, अभियांत्रिकी दोषांमुळे पाचव्या पिढीचे स्टील्थ जेट अजूनही बंद अवस्थेतच आहे. विमानाला पुन्हा उड्डाणासाठी तयार करण्याचे सर्व प्रयत्न आतापर्यंत अयशस्वी ठरले असल्याची पुष्टी सूत्रांनी केली आहे. अशा परिस्थितीत विमान पुन्हा इंग्लंडला घेऊन जाण्यासाठी दुसरा कोणताही मार्ग उरलेला नाही. तसेच हे विमान परत घेऊन जाण्याची कोणतीही अंतिम मुदत नसल्यामुळे, ब्रिटिश अधिकारी आता विमान परत आणण्यासाठी पर्यायी योजनांवर काम करत आहेत. लष्करी वाहतुकीच्या वतीने विमान परत नेण्यासाठी विमानाचे अंशतः विघटन केले जाणार असल्याचे सूत्राकडून सांगण्यात येत आहे.

# भाजपा आमदार किसन कथोरेंच्या बंगल्याबाहेर गोळीबार

बदलापूर : ठाणे जिल्ह्यातील बदलापूर येथे भाजपा आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्याबाहेर गोळीबार झाला. या गोळीबारात एक जण जखमी झाला. दोन गटात झालेल्या वादातून गोळीबार झाला. गोळीबाराची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा सुरू केला आहे.

भाजपा आमदार किसन कथोरे यांच्या बंगल्याबाहेर असलेल्या रस्त्यावर गोळीबार झाला. या गोळीबारात अल्ताफ शेख जखमी झाला. अल्ताफला खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. पोलीस अल्ताफची डॉक्टरांच्या परवानगीने चौकशी करणार आहेत. गोळीबार प्रकरणी घटनास्थळाच्या परिसरात असलेल्या लोकांकडे चौकशी सुरू आहे. तसेच संबंधित भागातील सर्व सीसीटीव्ही फूटेज तपासण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दोन गटात वाद का झाला ? गोळीबारापर्यंत प्रकरण का ताणले गेले ? गोळीबार कोणी केला ? या सर्व प्रश्नांची उत्तरं जाणून घेण्यासाठी पोलीस तपास करत आहेत. सत्ताधारी आमदाराच्या घराजवळ गोळीबार झाल्याने उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

# सिंधुदुर्गात मुसळधार : नद्यांची पातळी वाढली, काही ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती

## कर्ली नदी इशारा पातळीवरून : अनेक मार्ग पाण्याखाली

सिंधुदुर्ग, ३ जुलै : जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे जिल्ह्यातील तेरेखोल, कर्ली, गडनदी, वाघोटन, तिलारी या नद्या दुथडी भरून वाहत आहेत. कर्ली नदी इशारा पातळीच्या वरून वाहत असल्याने नदीकाठच्या गावांना तहसील कार्यालयाकडून दक्षतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात गेल्या २४ तासात १३९ मिमी पावसाची नोंद झाली. सर्वाधिक पाऊस कणकवली तालुक्यात २२० मिमी तर त्या खालोखाल सावंतवाडीत १८० मिमी तर कुडाळ मध्ये १७५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पुरसदृशय परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वाहतूक मार्ग पाण्याखाली गेल्यानं त्या ठिकाणची वाहतूक बंद होती. दरम्यान कोकण रेल्वेची वाहतूक तसेच सर्व घाट मार्गच्या ठिकाणाहून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

कुडाळ तालुक्यात सुद्धा कोसळत्या धारांनी जनजीवन विस्कळीत केले आहे. गेल्या २४ तासात कुडाळ मध्ये १७५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. कर्ली नदी इशारा पातळीच्या वरून वाहत आहे. कर्ली नदीची इशारा पातळी ९. ९१० मीटर एवढी आहे. पण आज दुपारी २ वाजता भंगसाळ पुलावर घेतलेली इशारा पातळी १० मित्र एवढी आहे. त्यामुळे कुडाळ शहारत आंबेडकर नगर येथील वस्तीत पाणी शिरलं आहे. दहा घरांना पुराच्या पाण्याने वेढल्याने त्या घरातल्या सदस्यांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. कर्ली नदीकाठच्या बाव, बांबुळी, पावशी, सरंबळ या गावांना तहसील कार्यालयाकडून दक्षतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पुरसदृशय परिस्थिती निर्माण झाली आहे. काही वाहतूक मार्ग पाण्याखाली गेल्यानं त्या ठिकाणची वाहतूक बंद होती. कडुअल शहरातून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावर सकाळी पाणी आल्याने तो मार्ग बंद होता. तर हॉटेल गुलमोहोर कडे पाणी आल्याने त्याठिकाणहून होणारी एसटी वाहतूक राज हॉटेल मार्गे वळविण्यात आली होती.




# नगरपालिका व्यापार संकुलाची इमारत कोसळली

## १५ दिवसांपूर्वी संकुल सोडण्याची नोटीस देण्यात आली होती



तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.०३ जुलै - शहरात नगरपालिकेचे व्यापारी संकुल इमारत तहसील कार्यालयासमोर असून दि.०३ रोजी दुपारच्या सुमारास कोसळली यात सुदैवाने कुठलीही जीवितहानी झाली नाही.

कन्नड नगरपरिषद कार्यालयासमोर पालिका प्रशासनाने व्यापारी संकुलन सुमारे ५० वर्षापूर्वी उभारले आहे. याच इमारतीवर अंदाजे २० वर्षांपूर्वी पालिका प्रशासनाने एक मजला बांधून सदरील इमारतीतील

गाळे शहरातील व्यापाऱ्यांना भाडे तत्वावर वापरण्यास दिले आहेत. मात्र या नवीन बांधलेल्या इमारतीच्या जिन्यावरील भिंतीला काही दिवसांपूर्वी तडे गेले होते. ही इमारत केव्हाही कोसळण्याची शक्यता वाढल्याने, पालिका प्रशासनाने १५ दिवसांपूर्वीच या इमारतीमधील सर्व व्यापाऱ्यांना गाळे खाली करण्यासंदर्भात नोटिसा बजावल्या होत्या. या व्यापाऱ्यांपैकी कुणीही गाळे खाली केले नाहीत. आज झालेल्या या दुर्घटनेत नगरपालिकेच्या दर्शनी भागातील वरच्या मजल्यावरील ३ दुकाना खालील चार दुकानांवर कोसळले या दुकानदारांचे लाखोंचे नुकसान झाले असून सुदैवाने जीवितहानी झालेली नाही.

ही घटना घडताच तहसिलदार विद्याचरण कडवकर, नायब तहसिलदार दिलीप सोनवणे, प्रशांत काळे, पुरवठा निरिक्षक निलेश राठोड तलाठी दिपक एरंडे, मंडळ अधिकारी रमेश चव्हाण, कन्नड शहर पोलिस स्टेशन पोलिस निरीक्षक रघुनाथ सानप, सहायक पोलिस निरीक्षक कुणाल सूर्यवंशी, पोलिस उपनिरीक्षक चांद मेंडके, सहायक फौजदार नासेर पठाण व त्यांचे सहकारी आणि पालिकेचे कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन दुकानातील नागरिक व व्यापाऱ्यांना दुकानाबाहेर काढून मदतकार्य सुरू केले. ही इमारत कोसळली तेव्हा इमारतीच्या वरच्या मजल्यावर सुमारे १०० ते १५० नागरिक आपल्या वेगवेगळ्या कामानिमित्त थांबलेले होते. त्यांना पोलिस व तहसील प्रशासनाने दुसऱ्या बाजूने सुखरूप खाली उतरविले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेला गती

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ जुलै -**
महापालिकेने सध्या शहरातील अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेतली असून, २३ जूनपासून सुरू करण्यात आलेली ही मोहिम तीव्र करण्यात आली आहे. अतिक्रमण हटाव पथकाकडून गेल्या आठ दिवसांत शंभर अतिक्रमणे हटविण्यात आली आहेत.

महापालिका आयुक्त पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मानसी मीना यांना शहरातील मुख्य रस्त्यांच्या बाजूला असलेल्या फूटपाथवर अतिक्रमण करण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरू केली. या मोहिमेंतर्गत शहरातील औसा रोड, अंबाजोगाई रोड, गांधी चौक ते मध्यवर्ती बसस्थानक, गंजगोलाई, भुसार लाईन, कापड लाईन येथील अतिक्रमण हटविण्यात आले. ही अतिक्रमण हटाव मोहीम अतिक्रमण विभाग प्रमुख रवी कांबळे यांच्या पथकाकडून राबविली जात आहे. अतिक्रमणमुक्त फूटपाथमुळे आता नागरिकांनाही फूटपाथचा वापर सहजतेने करणे शक्य झाले आहे.

अतिक्रमणाप्रमाणेच अनधिकृत बॅनरही हटविण्यात येणार आहेत. यापुढे बॅनरसाठी क्यूआर कोड बंधनकारक असणार आहे. क्यूआर कोड शिवाय बॅनर लावल्यास संबंधितांवर दंडात्मक व फौजदारी कारवाई केली जाणार असल्याच्या सक्त सूचना आयुक्त मानसी मीना यांनी बॅनर्सशी संबंधित यंत्रणेला दिल्या आहेत.

ही अतिक्रमण हटाव मोहीम ३० जूनपर्यंत चालणार होती. परंतु, एवढ्या कालावधीत अतिक्रमण हटविण्याचे काम पूर्ण होणार नसल्याने आयुक्त मानसी मीना यांनी ११ जुलैपर्यंत या मोहिमेला मुदतवाढ दिली आहे.



### संक्षिप्त वृत्त...

## सेवानिवृत्तीबद्दल लालासाहेब पाटील यांचा लातुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
जेएसपीएम संचालित स्वामी विवेकानंद विद्यालय एमआयडीसी, लातूर येथील वरिष्ठ लिपीक लालासाहेब पाटील हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या या सेवानिवृत्ती बद्दल जेएसपीएम संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्याहस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी जेएसपीएम संस्थेचे शैक्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील रावणगावकर,प्राचार्य गोविंद शिंदे, प्राचार्य मारुती सूर्यवंशी, उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, उपमुख्याध्यापक बाळाराम पिचारे, उपमुख्याध्यापक गणेशराव कदम, विनोद सूर्यवंशी, प्रशांत कांबळे, चाटे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

## टुरिझमच्या नावाखाली पावणेतीन लाखांचा गंडा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
टुरिझमच्या नावाने नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीला उदगीर ग्रामीण पोलिसांनी अटक केली आहे. शहराजवळील कौळखेड येथील शिवम रिसॉर्टमध्ये राहून या टोळीने २ लाख ७४ हजार रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे.

पोलिसांनी सांगितले, २७ जून ते २८ जून २०२५ या दरम्यान बाहेरून आलेल्या या टोळीने शिवम रिसॉर्टमध्ये मुक्काम केला. त्यांनी शहरातील विविध लोकांना फोन करून स्वतःला हॉलिडे टुरिस्ट कंपनी असल्याचे सांगितले व कमी किमतीत टुरिझम सुविधा देण्याचा दावा करून त्यांना बोलावले. मात्र, त्यांना येताना जोडीदार महिला सोबत घेऊन यावे लागल्याचे बंधनकारक केले. टुरिझम पॅकेजसाठी २५ हजार रुपये अगोदर घेतले जात होते आणि उरलेली रक्कम टप्प्याटप्प्याने कशी भरणार याबाबत माहिती दिली जात होती. यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी टूर झाली असल्याचा दावा करून अनेकांना फसवले गेले. या प्रकरणी धोंडीराम शिवाजी धुर्वे (रा. शिवनगर कॉलनी, उदगीर) यांनी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला.

## तीस वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला बेड्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
देवणी पोलिसांना गेल्या तीस वर्षांपासून गुंगारा देत असलेल्या फरार आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर यांच्या नेतृत्वातील पथकाने मंगळवारी अटक केली.

देवणी पोलीस ठाणे हद्दीतील एका गुन्ह्यातील आरोपी गोविंद तुकाराम राठोड याच्याविरुध्द गुन्हा दाखल होता. गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार होता. तो सतत त्याची राहण्याची ठिकाणे तसेच ओळख लपवून पोलिसांना गुंगारा देत होता. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी विविध गुन्ह्यांतील फरार आरोपींचा आढावा घेऊन अटक करण्याचे आदेश दिले. पोलीस अधीक्षक तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने फरार आरोपींची माहिती घेतली. १९९४ मधील देवणी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील फरार आरोपी गोविंद तुकाराम राठोड (वय ५९, रा. ढोबळेवाडी, ता. गंगाखेड, जि. परभणी) याला मंगळवारी लातूर शहराततील नवीन रेणापूर नाका परिसरातून पथकाने अटक करून पुढील तपासासाठी देवणी पोलिसांच्या ताब्यात दिले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस अंमलदार विनोद चलवाड, राजेश कंचे, सूर्यकांत कलमे यांनी ही सेवा बजावली.

## राहुल नगरातून दुचाकीची चोरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
शहरातील राहुल नगर येथे पार्किंग केलेल्या एमएच २४ बीव्ही २७४७ या क्रमांकाच्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना घडली.

जुन्या वापरातील २५ हजार रुपये किमतीची दुचाकी असल्याचे तक्रारीत नमूद आहे. याबाबत रमेश महादेव अंकुशराव (रा. राहुलनगर, लातूर) यांनी गांधी चौक पोलिसात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार सूर्यवंशी करीत आहेत.

# ट्युशन एरियात टगेगिरी करणाऱ्यांना नुतन अधिक्षकांचा 'दणका'

## पदभार स्वीकारताच 'ऑन फील्ड'



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
नूतन पोलीस अधीक्षक अमोल तांबे हे आपला कार्यभार हाती घेताच 'ऑन फील्ड' आले आहेत. मंगळवारी रात्री कोम्बिंग ऑपरेशन व पायी पेट्रोलिंगदरम्यान त्यांनी ट्युशन एरियातील विविध आस्थापनांची माहिती घेतली. या परिसरातील ठराविक ठिकाणी विद्यार्थिनींसोबत गैरवर्तन होत असल्याची बाब काहीजणांनी निदर्शनास आणून दिल्यानंतर पोलीस अधीक्षक तांबे यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार बुधवारी ट्युशन एरियात गैरवर्तन व टगेगिरी करणाऱ्या १३ मुलांविरुध्द कारवाई करण्यात आली.

लातूर शहरास जिल्हा शांत व सुसंस्कृत आहे. येथे सर्वधर्म समभावाने नागरिक एकमेकांसोबत गुण्या-गोविंदाने राहतात. परंतु, मागील काही महिन्यांपासून लातूरमध्ये गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. अवैध दारूविक्रीचे प्रमाणही वाढले आहे. गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा शहरासह जिल्ह्यात शिरकाव होत असल्याने माफियांची संख्याही वाढत आहे. यातून खून, अपहरण असे प्रकार वाढत आहेत. याला आळा घालण्याचे आव्हान नूतन पोलीस अधीक्षक तांबे यांच्यासमोर आहे.

पोलीस अधीक्षक तांबे यांनी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांना भेटी दिल्यानंतर शहरातील गुन्ह्यांची स्थिती त्यांनी जाणून घेतली. कोणत्या भागात जास्त गुन्हेगारी वाढत आहे, त्यासाठी काय उपाययोजना राबवाव्या लागतील, कुठे काय सुरू आहे, लातूरकरांच्या अपेक्षा काय आहेत, याचा त्यांनी आढावा घेतला. त्यानुसार संवेदनशील भागांवर लक्ष केंद्रित करणे, लातूरमधील वाढत्या गुन्हेगारीच्या मुळापर्यंत जाऊन गुन्हेगारीला पोषक वातावरण निर्माण करणाऱ्या घटकांचा बिमोड करण्यासाठी त्यांनी पावले उचलली आहेत. त्यानुसार पोलीस अधीक्षक तांबे यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयातील शाखांसह शहरातील चारही पोलीस ठाण्यांना भेटी देऊन पोलीस ठाणे परिसर, तेथील भौगोलिक, राजकीय, ऐतिहासिक महत्त्व, गुन्हेगारी परिस्थितीची माहिती घेतली.

लातूर शहराला मोठी शैक्षणिक पार्श्वभूमी असल्याने पोलीस अधीक्षक तांबे यांनी शहरातील नावाजलेल्या व वर्दळीच्या ट्युशन एरिया परिसरात मंगळवारी रात्रीच्या सुमारास तांबे यांनी अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, शहर उपविभागीय पोलीस अधिकारी रणजीत सावंत व शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिलीप सागर आणि त्यांच्या टीमसह ट्युशन एरिया परिसरात पायी पेट्रोलिंगदरम्यान तेथील क्लासेस, हॉस्टेल्स, कॅफे व इतर शैक्षणिक सुविधा पुरवणाऱ्या आस्थापनांची माहिती घेतली. तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनींशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. काहींनी ठराविक एरियात मुलींबरोबर गैरवर्तन होत असल्याचे निदर्शनास आणून दिल्यानंतर पोलीस अधीक्षक तांबे यांनी कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार बुधवारी सकाळी शिवाजीनगर ठाण्याच्या पथकाने ट्युशन एरियामध्ये धडक कारवाई करून विनाकारण थांबून गैरवर्तन करणाऱ्या १३ मुलांविरुध्द कारवाई करण्यात आली.

## सत्संग प्रतिष्ठानच्या आषाढी वारीची जय्यत तयारी

### ३१ बसद्वारे १५०० वारकऱ्यांना मोफत पंढरपूर यात्रा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
येथील श्री सत्संग प्रतिष्ठानच्यावतीने पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनासाठी गेल्या २५ वर्षांपासून वारकऱ्यांसाठी मोफत वारीचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाचे यंदा रौप्यमहोत्सवी वर्ष असून, शनिवारी (दि.५) शहरातील मध्यवर्ती बसस्थानकातून मोफत बसेस सोडण्यात येणार आहेत. यावेळी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची उपस्थिती राहणार आहे. यावर्षी ३१ बसेसद्वारे १५०० वारकऱ्यांना मोफत पंढरपूर यात्रा घडवून आणण्याचा संकल्प प्रतिष्ठानने केला आहे, अशी माहिती अध्यक्ष गोविंद पारिख आणि सचिव चंदूशेठ लड्डा यांनी दिली आहे.

शनिवारी सकाळी ११ वाजता मध्यवर्ती बसस्थानकात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील व आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लातूर अर्बन बँकेचे चेअरमन आकाश राठी, 'आरसीसी'चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर, प्रादेशिक मारवाडी युवा मंचचे अध्यक्ष कैलास राठी, गीता परिवारचे संचालक जुगल बियाणी उपस्थित राहणार आहेत. वारकऱ्यांसाठी हरिपाठ, माळ, फराळ, पाणी बॉटल, बॅग देण्यात येणार आहे. या उपक्रमात प्रतिष्ठानचे अध्यक्ष पारिख, सचिव लड्डा, कार्याध्यक्ष रमेशचंद्र भुतडा, उपाध्यक्ष दत्ता लोखंडे, कोषाध्यक्ष श्याम मुंदडा, संघटक जुगलकिशोर झंवर, सहकोषाध्यक्ष लक्ष्मीकांत बियाणी, सहसचिव केतन हलवाई, संघटक संगम खंदारे, कार्यालय प्रमुख बालाजी बारबोले यांच्यासह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सहकार्य लाभले आहे.



## डिक्की तोडून ५ लाख रुपये लंपास :गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
दुचाकीच्या डिक्कीत ठेवलेले पाच लाख रुपये डिक्की तोडून चोरट्याने लंपास केल्याची घटना शहरातील बसस्थानक परिसरात मंगळवारी घडली असून, या प्रकरणी औसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

औसा शहरात गेल्या काही दिवसांपासून अवैध धंदे, लॉजेसवरील अनैतिक प्रकार, दिवसा चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. यामुळे चोरटे व अवैध धंदेवाल्यांवर पोलिसांचा वचक नसल्याचे दिसून येत आहे. दरम्यान, मंगळवारी दुपारी दुचाकीची डिक्की तोडून पाच लाख रुपये लंपास केल्याची घटना घडली. याकतपूर येथील व्यंकट पांडुरंग सूर्यवंशी यांनी मंगळवारी दुपारी घर बांधकामासाठी म्हणून सोने विकून आलेले तीन लाख रुपये आणि शेतातील माल विकून आलेले दोन लाख रुपये असे पाच लाख रुपये एका पिशवीत घेऊन ते दुचाकीच्या डिक्कीमध्ये ठेवले होते. दरम्यान, बसस्थानकासमोर दुचाकी उभी करून ते एका दुकानात गेले असता, चोरट्यांनी काही वेळातच डिक्की तोडून डिक्कीतील पाच लाख रुपये लंपास केले. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## जवळगा येथे रामलिंगेश्वर मंदिरात 'परु' महोत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
तालुक्यातील जवळगा येथील 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा असलेल्या ग्रामदैवत श्री रामलिंगेश्वर देवस्थान, मांजरा नदीकाठावर पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेला परुचा (महाप्रसाद) कार्यक्रम यंदा सोमवारी झाला. यावेळी पावसाने पेरणीनंतर मोठी उघडीप दिल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. या परूच्या कार्यक्रमात ग्रामदैवत श्रीक्षेत्र रामलिंगेश्वर चरणी ग्रामस्थांच्यावतीने पावसासाठी साकडे घालण्यात आले.

श्री रामलिंगेश्वर देवस्थान हे पंचक्रोशीतील जागृत देवस्थान म्हणून प्रसिध्द असून, येथे ग्रामस्थ पिढ्यान्‌पिढ्यापासून दरवर्षी जून महिन्यातील पौर्णिमेनंतर येथे सर्व ग्रामस्थ एकत्रित येऊन परू करतात. कार्यक्रमास तहसीलदार सोमनाथ वाडकर, गटविकास अधिकारी सागर वरांडेकर, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गौंड, जिल्हा बँकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष पंडित धुमाळ, बालाजी कारभारी, ऋषिकेश बद्दे, डॉ. अरविंद भांताब्रे, दिशा प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोनू डगवाले, महेश जाधव, उद्योजक रवींद्रकुमार पाटील, बालाजी बिरादार, शिवानंद स्वामी, गंगाधर बदनाळे, गणेश महाजन आदींची उपस्थिती होती.

## शिबिरात ८८ जणांची आरोग्य तपासणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
'डॉक्टर्स डे'चे औचित्य साधून लातूर मेडिकल असोसिएशन, रोटरी क्लब मिडटाऊन आणि पोद्दार हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात ८८ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने आयोजित हे १५०वे मोफत आरोग्य शिबिर होते.

या शिबिराचे उद्घाटन विलास साखर कारखान्याच्या अध्यक्षा वैशालीताई देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ बालरोग तज्ज्ञ सुरेश भट्टड, 'आयएमए'च्या माजी अध्यक्षा डॉ. सुरेखा काळे, ज्येष्ठ अस्थिशल्य चिकित्सक डॉ. दिलीप देशपांडे, डॉ. ब्रिजमोहन झंवर, 'आयएमए'चे अध्यक्ष डॉ. अभय कदम, भावना पोद्दार, आयएमए महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. ज्योती सूळ, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी वैशालीताई देशमुख यांनी पोद्दार हॉस्पिटलच्यावतीने असे आरोग्यदायी उपक्रम सातत्याने राबविण्यात येत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. अशोक पोद्दार यांच्यासह सर्वच डॉक्टर मंडळी सदैव लोकांची सेवा करण्यासाठी तत्पर असतात. लातूरला आम्ही आमचे घर समजतो. त्यामुळे लोकांनी प्रेमाने बोलावले की, आम्ही अशा उपक्रमांना उपस्थित राहतो, असेही त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोपात डॉ. भट्टड यांनी केला.

या शिबिरात ३५ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले तर ७० रुग्णांची मोफत हाडांच्या ठिसूळतेची तपासणी करण्यात आली. ३२ रुग्णांना व्हिटॅमिन डी ३ च्या गोळ्यांचे मोफत वाटप करण्यात आले. तसेच ३० रुग्णांची न्यूरोपॅथी तर १८ रुग्णांची रक्त तपासणी करण्यात आली.

## 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज'च्या उभारणीस आवश्यक अतिरिक्त निधी मंजूर करा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
लातूर शहराच्या सौंदर्यात भर टाकणारा आणि महाराष्ट्रातील सर्वात मोठा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी पुतळा अर्थात 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज'च्या उभारणीसाठी यापूर्वी १० कोटी रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. मात्र, महापालिकेने अतिरिक्त १२ कोटी रुपयांच्या निधीचे अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर निधी मंजूर न झाल्याने 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज'च्या उभारणीस प्रारंभ झाला नाही. त्यामुळे आवश्यक असणारा अतिरिक्त १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे भाजप शहराध्यक्ष अजित



पाटील कव्हेकर यांनी केली आहे.

शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कच्या परिसरात उभारण्यात येणाऱ्या 'स्टॅच्यू ऑफ नॉलेज' अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७५ फुटी पुतळ्याच्या कामासाठी तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. सदर निधी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वर्गही झाला आहे. मात्र, या पुतळा उभारणीसाठी महापालिकेने २२ कोटींचे अंदाजपत्रक तयार केले आहे. अतिरिक्त १२ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता आहे. सदर अंदाजपत्रक महापालिका प्रशासनाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादरही केले आहे.

यासाठी अतिरिक्त १२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करावा आणि या पुतळ्याच्या भूमिपूजनास उपस्थित राहावे, अशी विनंती भाजपचे शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## विठ्ठल रुक्मिणी मंदिरात कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
येथील देव नदीच्या तीरावर असलेल्या आणि पंचक्रोशीत प्रतिपंढरी म्हणून समजल्या जाणाऱ्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरात ३ ते १० जुलैपर्यंत अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

रमेश महाराज मेहकरकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम होणार असून, दररोज सामुदायिक ज्ञानेश्वर पारायण, तुकोबाराय गाथा भजन, प्रवचन, हरिपाठ व हरिकीर्तन व पहाटे काकडा आरती होणार आहे. १० जुलै रोजी सखाराम महाराज पालमकर यांचे काल्याचे कीर्तन होईल. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'दयानंद'मध्ये नाईक यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.३ जुलै -**
दयानंद कला महाविद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री 'कृषिरत्न वसंतराव नाईक यांची जयंती ' महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कृषिरत्न वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. के आंध्रदेव यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती झाशी लक्ष्मीबाई आंध्रदेव व मुलगा के. विद्याधर व उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विषयाचे माजी विभाग प्रमुख डॉ . ए. आर. पाटील यांनी पुष्पमाला अर्पण करून अभिवादन केले.



१९७२ साली राज्यासह देशभरात भयानक दुष्काळामध्ये देशातील जनतेची अन्नावाचून हाल हाल होत असताना त्यांनी राज्यातील शेतकऱ्यांसाठी अनेक महत्वाच्या योजना राबवल्या. त्यामुळे त्यांना 'हरित क्रांतीचे प्रणेते' म्हणून ओळख मिळाली. 'शेतकरी सुखी तर देश सुखी' हा विचार मनात बाळगून त्यांनी शेती उत्पादनात वाढ, अन्नधान्यात स्वयंपूर्णता, सहकारी संस्थांना बळकटी, असे महत्वाचे निर्णय घेतले. त्यांच्या अशा विविध सामाजिक कार्यांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, संजय व्यास, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्र कृषी दिनसाजरा



छत्रपती संभाजीनगर: वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विदयापीठ परभणी संलग्नित छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित कृषी महाविद्यालय कांचनवाडी छत्रपती संभाजीनगर येशील चतुर्थ वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण जागरूकता कृषी कार्यानुभव कार्यक्रम आणि कृषी औदयोगिक संलग्न या उपक्रमांतर्गत गीधाडा ता.पैठण जि. छत्रपती संभाजीनगर येथे कृषी दिंडी , वृक्षारोपण व जिल्हा परिषद प्रशाळा येथील विदयार्थ्यांची चित्रकला स्पर्धा आयोजित करून महाराष्ट्र कृषी दिन साजरा केला. प्रगतशील शेतकरी मा.श्री.ऋषिकेश आगाज , सरपंच मा.श्री.रामेश्वर जाधव , ग्रामसेवक एन.डी. कळसकर आणि शाळेचे मुख्याध्यापक श्री. ए. एस. शिंदे सर यांनी वृक्षारोपणाचे महत्व या विषयी मार्गदर्शन केले तसेच चित्रकला स्पर्धेतील प्रथम, द्वितिय व तृतीय आलेल्या विध्यार्थ्यांना पारीतोषिक देऊन त्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमासाठी छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकर मुळे, अध्यक्ष रणजीत मुळे संस्थेचे विश्वस्त , समीर मुळे यांचे मार्गदर्शन तर छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख सर आणि कृषी महाविद्यालयाचे संचालक डॉ. जगदीश जहागीरदार यांचे प्रोत्साहन लाभले. तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बैनाडे उपप्राचार्य श्री.प्रा.अतुल भोंडवे, कार्यक्रम समन्वयक डॉ. आर.पी.डोंगरजाळ व कार्यक्रम अधिकारी डॉ.स्वाती मुंढे यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले. गावातील ग्रामस्थांच्या मदतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले सरपंच मा.श्री.रामेश्वर जाधव , ग्रामसेवक एन.डी. कळसक, शालेय समिति अध्यक्ष श्री अर्जुन गिर्हे,शाळेचे मुख्याध्यापक श्री. ए. एस. शिंदे सर , शिक्षक जि.प.शाळा श्री.वाघमारे सर , ग्रामस्थ व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गावाला लाभलेले कृषीदूत विद्यार्थी विष्णु दशरथे, शेख जिशान, श्रीराम वाघमोडे, ओम तोरणे,अनिकेत सूर्यवंशी, कृष्णा उंडे, रोहन वाघमारे, अजय वाघ, कृष्णा वाकळे, आदित्य राठोड, प्रमोद सूर्यवंशी, अनुष्का गावीत, निकिता सोनवणे, शेख महेकअंजुम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओम तोरणे व प्रास्ताविक शेख महेकअंजुम यांनी केले.तर आभार अनिकेत सूर्यवंशी यांनी मानले.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०४/२०२५.

अर्जदार : १. नारायण अहिल्याजी म्हस्के, वय. ६० वर्षे, धंदा. शेती, रा. नांदगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद. २. मंगलाबाई शेनफडू म्हस्के,, वय. ५९ वर्षे, धंदा. शेती, ३. गणेश शेनफडू म्हस्के, दोघेही रा. निंबायतीतांडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद.

–विरुध्द–

गैरअर्जदार – कोणीही नाही.

प्रकरण :– वारस प्रमाण–पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत ध्रुपताबाई अहिल्याजी म्हस्के हे दि. २१/०५/२००२ रोजी मौजे निंबायतीतांडा, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत ध्रुपताबाई अहिल्याजी म्हस्के यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– ०८/०८/२०२५.

आज दि. ०३/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा. श्रीमती. व्ही. एन. काटकर दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: २७९/२०२५

पुढील तारीख : २५/०७/२०२५

अर्जदार : १– जमुनाबाई भ्र. फत्तुसिंग राठोड, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद २– प्रकाश पिता फत्तुसिंग राठोड, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद

– विरुध्द–

गैरअर्जदार – महाराष्ट्र शासन, मार्फत– जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद /छत्रपती संभाजीनगर

अर्ज – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी. के. साळवे, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे येथील राहणारे असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चे पती व अर्जदार २ चे वडील नामे फत्तुसिंग मोतीराम राठोड हे दिनांक २३.८.२०१७ रोजी भारंबा तांडा येथे राहत्या घरी मयत झालेले आहे, सोबत ग्राम पंचायत कार्यालय भारंबा तांडा, ता. कन्नड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र अर्जा सोबत दाखल केले आहे. मयतांच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी वारस कार्यवाही करणेसाठी तलाठी कार्यालय, ग्राम पंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पूर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा

हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल. सबब आज दिनांक १७/०६/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.


दिनांक १७/०६/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

# शेतकरी पुत्राची गळफास घेऊन आत्महत्या; पाच महिन्यांपूर्वी पित्याने घेतला होता गळफास



सोयगाव,दि.३ जूलै :तालुक्यातील निंबायती येथील कर्जबाजारी शेतकरी पुत्राने कर्ज फेडण्याच्या विवंचनेत कंटाळून घरातच गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना बुधवरी (दि.२)सायंकाळी सहा वाजेच्या दरम्यान घडली.पाच महिन्यांपूर्वी जानेवारी महिन्यात पिता रामलाल चतरु राठोड यांनी कर्जाच्या ओझ्याखाली असल्याने गळफास घेत आत्महत्या केली होती.त्यामुळे एकच घरातील दोघांनी कर्जबाजारी मुळे पाच महिन्यात जीवन संपविले आहे. मयूर रामलाल राठोड(वय.२५) असे गळफास घेतलेल्या तरुण शेतकरी पुत्राचे नाव आहे.बुधवरी सायंकाळी सहा वाजता कर्जाच्या विवंचनेत त्याने गळफास घेतला. वडिलांनी आत्महत्या केल्या नंतर या शेतकरी पुत्राने कुटुंबाचा उदरनिर्वाहचा भार होता आधीच तीन लाख खासगी बँकेचे कर्ज त्यातच पुन्हा यंदाच्या खरीप हंगामात नैसर्गिक संकटात अडकल्याने व कर्जाचा डोंगर समोर असल्याने शेतकरी पुत्र मयूर राठोड यांनी कर्ज फेडण्याच्या विवंचनेत गळफास घेतला.दरम्यान त्यास तातडीने सोयगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता,वैद्यकीय सूत्रांनी त्यास तपासणी करून मृत घोषित केले त्याच्यावर शवविच्छेदन करून गुरुवारी सकाळी दहा वाजता जरंडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चयात आई,दोन बहिणी,काका असा परिवार आहे.जरंडी ग्रामपंचायतचे माजी सरपंच अमृत राठोड यांचा तो पुतण्या आहे.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०५/२०२५.

अर्जदार : १. राजेंद्र रामदास पाटील, वय. ६० वर्षे, धंदा. शेती, २. रविंद्र रामदास पाटील, वय. ५८ वर्षे, धंदा. शेती, दोघेही रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३. गोपाल रामदास पाटील, वय. ५५ वर्षे, धंदा. शेती, रा. टिळकनगर, सिल्लोड ता. सिल्लोड, जि. छत्रपती संभाजीनगर.

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत रामदास विठठल पाटील हे दि. ०१/१२/२०२१ रोजी मौजे. जरंडी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मुत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत रामदास विठठल पाटील यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– ०८/०८/२०२५.

आज दि. ०३/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०२/२०२५.

अर्जदार : १. पार्वताबाई भाऊलाल राठोड, वय. ७४ वर्षे, धंदा. शेती, २. पितांबर भाऊलाल राठोड, वय. ३५ वर्षे, धंदा. शेती, ३. डिगांबर भाऊलाल राठोड, वय. ५१ वर्षे, धंदा. शेती, रा. बनोटीतांडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर.

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण–पत्र मिळणें बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत भाऊलाल चिंधा राठोड हे दि. १६/०५/२०२५ रोजी मौजे. बनोटी, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत भाऊलाल चिंधा राठोड यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– ०६/०८/२०२५.

आज दि. ०३/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दि.किरकोळ. अर्ज.क्रं. ३२५/२०२५.

पुढील तारीख ०६/०८/२०२५.

अर्जदार : १. हिनाबाई भ्र. ज्ञानेश्वर राठोड, वय २९ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. पांगरा तांडा, ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर. २. कु. वैष्णवी तिपा ज्ञानेश्वर राठोड, वय २ १/२ वर्षे, रा. जन्मदाती आई अर्जदार क्र. १ हिनाबाई भ्र. ज्ञानेश्वर राठोड,

विरुद्ध

गैरअर्जदार : सावित्रीबाई भ्र. गोटीराम राठोड, वय ६० वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. पांगरा तांडा, ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर.

अर्ज :– बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. विजयकुमार का. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ चा पती व अर्जदार क्र. २ हिचा पिता व गैरअर्जदाराचा मुलगा नामे ज्ञानेश्वर गोटीराम राठोड रा. पांगरा तांडा, ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर / औरंगाबाद हा दिनांक १२/०६/२०२३ रोजी गावी पांगरा तांडा ता. कन्नड येथे मयत झाला आहे. अर्जात लिखाणाच्या सोयीकरिता त्यास ह्यापुढे मयत म्हणून संबोधलेले आहे. मयतास त्याचे मृत्यू पश्चात कायदेशीर वारस अनुक्रमे पत्नी, मुलगी व आई अर्थात अर्जदार आणि गैरअर्जदार हेच आहेत. ह्या व्यतिरिक्त मयत ज्ञानेश्वर गोटीराम राठोड यास इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. तथापि गैरअर्जदार ही सदर अर्जदारांसोबत येणेस उत्सुक नाही. करिता तिस वारस असल्याने औपचारिक पार्टी केलेले आहे. अर्जदार यास मयत ज्ञानेश्वर गोटीराम राठोड याच्या मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयत ज्ञानेश्वर गोटीराम राठोड हा मौजे पांगरा तांडा, ता. कन्नड येथे राहत असतांना मयत झाला आहे. सदरील मयतास अर्जदार व गैरअर्जदार हेच वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दिनांक १६/०६/२०२५ रोजी मौजे पांगरा तांडा, ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :– १/०६/२०२५.

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

**गा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: क्र.:४७/२०२५.

अर्जदारः १) सुभाष छैलाजी चनाल, वयः ६५ वर्षे, धंदाः शेती, रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. २) सुरेश छैलाजी चनाल, वयः ६८ वर्षे, धंदाः शेती, रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद.३) सुगंधाबाई पिता छैलाजी चनाल, वयः ७० वर्षे, धंदाः शेती, रा. साईबाबा मंदीर जवळ, विश्वास नगर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. ४) मंगलाबाई प्रकाश कंडारे, वयः ६० वर्षे, धंदाः शेती, रा. सांगवी ता. यावल जि. जळगांव. ५) मिराबाई रमेशसिंग खोडे, वयः ५७ वर्षे, धंदाः शेती रा. मकानं नं. ४० गल्ली नं. ०४. वीर राणी दुर्गावती वार्ड सिंघाड तलाई, वार्ड नं. ३४१, लालू किराणा दुकान जवळ, खंडवा, ता. व जि. खंडवा (मध्य प्रदेश).

// विरुध्द //

गैरअर्जदारः निरंक

अर्जः वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे छैलाजी उमाजी चनाल हे दिनांक ०४/०८/१९९६ ला मौजे रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक : १/८/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक : ३०/६/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा.आर.एस. तापडिया दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. २९०/२०२५.

पुढील तारीख १९/०७/२०२५.

अर्जदार : १. शेख शबानाबेगम शेख अहेमद सलीम, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. करंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. शेख नदीम अहेमद सलीम, वय ३३ वर्षे, धंदा शासकीय नौकरी, रा. करंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. शेख रफीक अहेमद अहेमद सलीम, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा. करंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. गुलनाज बेगम सैय्यद शाहरुख, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. पाचोरा, ता. पाचोरा, जि. जळगांव.

विरुद्ध

गैरअर्जदार :– महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अहेमद सलीम पिता सिराज मिया हे झकेरिया उर्दू प्राथमिक शाळा, करंजखेडा येथे सह शिक्षक या पदावर कार्यरत असतांना ते दि.२९/०४/२०२५ रोजी मयत झाले आहे ते मौजे करंजखेडा ता. कन्नड येथे कायम स्वरुपी वास्तव्यास होते व त्यांचा कायम स्वरुपीचा पत्ता करंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद हा आहे. अर्जदार क्र. १ ही मयत अहेमद सलीम पिता सिराज मिया यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४ ही विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्रं. २ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार कं. १ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत अहेमद सलीम पिता सिराज मिया यांचे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील नामे अहेमद सलीम पिता सिराज मिया हे दि.२९/०४/२०२५ रोजी करंजखेडा येथे मरण पावले आहे. सोबत मयत अहेमद सलीम पिता सिराज मिया यांचे ग्रामपंचायत कार्यालय, करंजखेडा यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र मा. न्यायालयाच्या अवलोकनार्थ दाखल करीत आहे. तसेच मयताचे वडील सिराजमिया पिता वजिरमिया हे दि.११/०९/२०१६ रोजी मरण पावले असून मयताची आई सलीमाबी भ्र. सिराजमिया ह्या सुद्धा दिनांक २५/०८/१९८४ रोजी मरण पावल्या आहेत. अर्जदार क्रं. १ ते ४ यांना मयत अहेमद सलीम पिता सिराज मिया यांचे मृत्यू पश्चात संबंधीत अधिकाऱ्यांनी वारस प्रमाण पत्राची मागणी केली असता व तसेच इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी अर्जदार कं, १ ते ४ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सदरील मयतास अर्जदार कं. १ ते ४ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०१/०६/२०२५ रोजी मौजे करंजखेडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :–२९/०६/२०२५.

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

## जाहिर प्रगटन

**मा. व्हि. डी. पाटील दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २२८/२०२५ पुढील तारीख ०५/०७/२०२५

अर्जदार – १. नानुबाई नारायण मगर, वयः ८७ वर्ष, धंदाः घरकाम, रा. हिवरखेडा खु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. शिवनाथ नारायण मगर, वयः ७५ वर्ष, धंदाः शेती, रा. हिवरखेडा खु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. गोरखनाथ नारायण मगर, वयः ६७ वर्ष, धंदाः शेती, रा. हिवरखेडा खु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. संतोष नारायण मगर, वयः ५१ वर्ष, धंदाः शेती, रा. हिवरखेडा खु, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. हिराबाई रंगनाथ वाळुंजे वयः ६३ वर्ष, धंदाः घरकाम, रा. कनकावती नगर कन्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. कासाबाई रतन उधार वयः ६९ वर्ष, धंदाः घरकाम, रा. श्रीराम कॉलनी कन्न्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. कालिंदा मन्सुब खेडकर वयः ७९ वर्ष, धंदाः घरकाम, रा. बुट्टे वाडगाव, ता. गंगापुर. जि. औरंगाबाद. ८. नंदाबाई राजीव थोरात वयः ४९ वर्ष, धंदाः घरकाम, रा. नाचनवेल, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ८ हे मयत नारायण श्रीपत मगर यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ८ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयम नारायण श्रीपत मगर यांचे अर्जदार क्र. १ हि पत्नी असुन अर्जदार क्र. २ ते ८मुले व मुली आहे. नाम मयत नारायण श्रीपत मगर यांना अर्जदार क्र. १ ते ८ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत नारायण श्रीपत मगर अर्जदार क्र.१चे पती व २ ते ८ यांचे वडील हे दि. १२/०३/२००६ रोजी मयत झालेली आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा हिवरखेडा (नां), ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत नारायण श्रीपत मगर यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसंच संवधित नलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसंच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआथर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळवण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या वावत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २४/०६/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

## जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०३/२०२५.

अर्जदार : १. विकास रोहीदास राठोड, वय. २८ वर्षे, धंदा. शेती, २. नारायण रोहीदास राठोड, वय. ३३ वर्षे, धंदा. शेती, ३. संत्रीबाई रोहीदास राठोड, सर्व रा. वरखेडी बु.,, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

–विरुध्द–

गैरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण – वारस प्रमाण–पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत रोहीदास शंकर राठोड हे दि. २९/०८/२०२२ रोजी मौजे. वरखेडी बु... ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत रोहिदास शंकर राठोड यांचे एकमेव वारस असुन त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द झाल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह ऊजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईल. पुढील तारीख :– ०६/०८/२०२५.

आज दि. ०३/०७/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले.

आदेशांवरुन,

विभागीय लिपीक, सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

## जाहिर प्रगटन

**मा.आर.एस. तापडीया दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ३०५/२०२५

पुढील तारीख ०२/०८/२०२५

अर्जदार : १. सलमाबानो मुकीद शेख, वयः ४० वर्ष, धंदाः घरकाम, रा. नितीन नगर कन्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. सानिया आसिफ शेख, वयः २२ वर्ष, धंदाःशिक्षण, रा. विटा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. जिशान मुकीद शेख, वयः १९ वर्ष, धंदाः शिक्षण, रा.नितीन नगर कन्न्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. सुमेरा मुकीद शेख, वयः १६ वर्ष, धंदाः शिक्षण, रा.नितीन नगर कन्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. अयान मुकीद शेख, वयः १३ वर्ष, धंदाः शिक्षण, रा. नितीन नगर कन्ड, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगावाद.

अर्ज : अर्जदार क्रः १ ते ५ हे मयत नामे मुकीद तमिजोद्दीन शेख यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे वावते. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आंहे. मयत नामे मुकीद तमिजोद्दीन शेख यांचे अर्जदार क्र. १ चे पति असुन अर्जदार क्र. २ ते ५ मुले व मुलगी आहे. मयत नामे मुकीद तमिजोद्दीन शेख यांना अर्जदार क्र. १ ते ५ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत मुकीद तमिजोद्दीन शेख अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र. २ ते ५ चे वडील हे दि. २५/०३/२०२३ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा मौजे कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत मुकीद तमिजोद्दीन शेख यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संवधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या वावत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः २६/०६/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

## जाहिर प्रगटन

**मा.आर.एस. तापडीया दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. २८४/२०२५ पुढील तारीख २०/९/२०२५

अर्जदार – १. दिलीप बुढाजी नवले, वयः ६५ वर्ष, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. नारायण बुढाजी नवले, वयः ७६ वर्ष, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. कडुबाई अहलाजी खडके, वयः ८९ वर्ष, धंदाः घरकाम, दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. संपत बुढाजी नवले (मयत) ४.१. पांडुरंग संपत नवले. वयः ५५ वर्ष, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.२. अलका विनायक मोकासे वयः ४५ वर्ष, धंदाः घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.३. संगीता निवृत्ती मोकासे वयः ४० वर्ष, धंदाः घरकाम, रा, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.४. उषाबाई देविदास वाघ वयः ४१ वर्ष, धंदाः घरकाम, रा. करंजखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. जयराम बुढाजी नवले (मयत) ५.१ रत्नाबाई जयराम नवले वयः ४९ वर्ष, धंदाः घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.२ पंकज जयराम नवले वयः ३३ वर्ष, धंदा. शेती, रा. दिगर, पिशांर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.३. विशाल जयराम नवले वयः ३० वर्ष, धंदाः शेती. रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.४. चेतन जयराम नवले वयः २८ वर्ष, धंदाः शेती, रा. दिगर, पिशार, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन, व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ५.४ हे मयत नामे बुढाजी पांडु नवले व अर्जदार क्र. ४ संपत बुढाजी नवले व अर्जदार क्र.५ मयत नाम जयराम बुढाजी नवले यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआथर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ५.४ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत नामे बुढाजी पांडु नवलं व अर्जदार क्र. ४ संपत बुढाजी नवले व अर्जदार क्र.५ मयत नामं जयराम बुढाजी नवले यांचे अर्जदार क्र. १ ते ३ मुलं असुन अर्जदार क्र. ४ व ५ हि मयत मुले होती. अर्जदार क्र. १ ते ३ मुले व मुलगी आहे अर्जदार क्र.५.१ हि सुन तसेच अर्जदार क्र. ४.१ ते ५.४ हि नातु आहे. नामे मयत नामे बुढाजी पांडु नवले व अर्जदार क्र. ४ संपत बुढाजी नवले व अर्जदार क्र.५ मयत नामे जयराम बुढाजी नवले यांना अर्जदार क्र. १ ते ५.४ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत मयत बुढाजी पांडु नवले अर्जदार क्र. १ ते ३ व ४.५ चे वडील व ५.१ यांचे सासरे व ४.१ ते ५.४यांचे आजोबा हे दि. १६/०६/१९९० रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा पिशोर, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत बुढाजी पांडु नवले यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः २१/०६/२०२५

आदेशावरून

क. लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

## अग्रलेख...

# सांसदीय परंपरांचे व्हावे पालन

महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मंगळवार, १ जुलै २०२५ रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते, काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष, विधानसभेचे माजी अध्यक्ष आमदार नाना पटोले विधानसभेच्याच विद्यमान अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले. स्वतः अध्यक्षपद 'भूषविलेल्या' नाना पटोले यांनी राजदंड उचलण्यासाठी तो हातात घेण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी आ. पटोले यांना वारंवार समजावण्याचा प्रयत्न केला. पण पटोले काही ऐकत नव्हते. अध्यक्षांच्या खुर्चीजवळ जाऊन ते वाद घालतच राहिले. आपण विधानसभा अध्यक्ष राहिले आहात, आपण असे वर्तन करणे योग्य नाही, हे आपल्यासारख्याला शोभत नाही आपल्याकडून अशा भाषेची अपेक्षा नाही असे ॲड. नार्वेकर यांनी वारंवार सांगूनही काही उपयोग झाला नाही.

राजदंडाला हात लावल्यास काय कारवाई करायची याचा नियम तुम्हीच अध्यक्ष असताना बनविला होता याचीही आठवण आ. पटोले यांना यावेळी करून देण्यात आली. पण काही उपयोग झाला नाही. पटोले यांची दांडगाई सुरूच राहिली. अखेर माजी अध्यक्ष पटोले यांनीच ठरवून दिलेल्या नियमानुसार आमदार पटोलेंवरच कारवाई करणे विद्यमान विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांना भाग पडले. त्यांनी नाना पटोले यांना दिवसभरासाठी निलंबित करून टाकले. निलंबन झाल्यानंतरही पटोलेंचा हेका सुरूच होता. सभागृहाबाहेर जाण्यासाठी त्यांना वारंवार समज देण्यात आली. तरी ते ऐकेचनात. अखेर आ. पटोले यांचे समर्थक, विरोधी पक्षाच्या नेत्यांनी घोषणाबाजी करत सभात्याग केला. आ. पटोलेंचे एक दिवसाच्या निलंबनावर निभावले नाही, तर विधानसभा अध्यक्षांना अधिक कडक शिस्तभंग कारवाई करावी लागली असती.

मुळात आमदार नाना पटोले यांनी शून्य तासात आक्रमक होत मंत्री माणिकराव कोकाटे आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ सदस्य बबन लोणीकर यांनी सातत्याने शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा आरोप करून त्यांनी माफी मागावी अशी मागणी केली. अशी मागणी करणे विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांचे काहीच चूक नव्हते, पण चुकली ती पद्धत. सांसदीय कामकाजाच्या पद्धतीनुसार त्यांनी पुढे जायला हरकत नव्हती. पण त्यांना घाई झाली आणि त्यातूनच असे काही घडले. कदाचित 'हिरो' होण्याच्या भावनेतूनही असे घडले असावे. म्हणूनच तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, 'एखाद्या विषयावर भावना व्यक्त करणे वेगळे, पण अध्यक्षांवर धावून जाणे अशोभनीयच' असे म्हटले आहे.

उबाठा गटाचे आमदार अनिल परब यांनी विधान परिषदेत राज्याचे महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्यावर रेतीचोरीचा गंभीर आरोप केला. आ. परब यांनी सभागृहात पुरावे असल्याचा दावा करत, या राज्यमंत्र्यांवर कारवाईची मागणी केली. या आरोपांमुळे सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला. सत्ताधारी पक्षाने या आरोपांना बिनबुडाचे ठरवत खंडन केले, तर विरोधी पक्षाने या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी लावून धरली. १ जुलै २०२५ रोजी प्रकाशित एका बातमीनुसार, आमदार नाना पटोले यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारवर तीव्र टीका केली होती. त्यांच्या या टीकेला प्रत्युत्तर देताना सत्ताधारी पक्षाने त्यांच्यावर सभागृहातील शिस्तभंगाचा आरोप लावला. यामुळे सभागृहाचे कामकाज काही काळ विस्कळीत झाले, अशी सारवासारव विरोधी पक्षाच्या नेत्यांनी या घटनाक्रमाच्या संदर्भात केली आहे.

नाना पटोलेंच्या निलंबनाचा मुद्दा हा २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील वादाच्या पृष्ठभूमीवर पाहता येतो. मार्च २०२५ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, विशेषतः धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्यावर. या अधिवेशनातही विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली होती, ज्यामुळे सभागृहाचे कामकाज अनेकदा खंडित झाले होते. याचप्रमाणे, उबाठाचे आमदार अनिल परब यांनीही, विशेषतः महसूल खात्याशी संबंधित मुद्यांवर यापूर्वीही अनेकदा सभागृहात आक्रमक भूमिका घेतलेली आहे. या अधिवेशनात राज्य सरकारने लाडकी बहीण योजना, शिवभोजन थाळी आणि इतर कल्याणकारी योजनांचा आढावा घेतला.

लाडकी बहीण योजनेसाठी निधी वितरण आणि त्याच्या अंमलबजावणीवर चर्चा झाली. विरोधी पक्षाने या योजनेच्या निधीवाटपात गैरव्यवहार झाल्याचा आरोप केला, तर सत्ताधारी पक्षाने योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीचा दावा केला. तसेच सत्ताधारी पक्षाने 'स्टॅण्डअप कॉमेडियन' कुणाल कामरा याच्यावर कारवाईची मागणी सभागृहात लावून धरली. कामरा याने एका कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर गाण्याच्या माध्यमातून टीका केली होती, ज्याला सत्ताधारी पक्षाने अवमान मानला. यावरून सभागृहात तीव्र चर्चा झाली आणि सत्ताधारी पक्षाने कठोर कारवाईची ग्वाही दिली. अशा काही गरमागरमीच्या विषयांवर सत्ताधारी अडचणीत आले म्हणून आमदार नाना पटोलेंवर भडास काढण्याचा हा प्रकार होता, असा दावा काहींनी केला. पण आ. पटोले सभापतींवर धावून गेले, त्यांच्याशी वाद घातला, राजदंड उचलण्याचा प्रयत्न केला हे कोणीही अमान्य करत नाही, आणि हा घटनाक्रमच निलंबन कारवाईसाठी कारण ठरला आहे, हेसुद्धा निश्चितपणे खरे आहे. या संदर्भातील सारे पुरावे, छायाचित्रे, दृक्-श्राव्य छायाचित्रण, हे सारेकाही आमदार नाना पटोले यांच्या असांसदीय वर्तनावर बोट ठेवणारेच आहेत, हेही अगदीच स्पष्ट आहे.

महाराष्ट्राच्या विधानसभा सभागृहातीलच एक जुना प्रसंग या निमित्ताने आठवला. बरोबर एकसष्ट वर्षांपूर्वी १९६४ च्या ऑगस्ट महिन्यात त्यावेळच्या विरोधी पक्षातील आक्रमक आमदार, विदर्भातील लढवय्ये लोकनेते जांबुवंतराव धोटे त्यावेळी 'फुल्ल फॉर्मा'त होते. त्या, १२ ऑगस्ट या दिवशी सभागृहात कामकाज सुरू असताना तरुण रक्ताचे धोटे बोलण्याच्या तयारीत असताना त्यांना बोलू दिले जात नसल्यामुळे ते संतापले होते. त्यातच त्यांचा माईक बंद पडला किंवा बंद पाडला म्हणून ते अधिकच संतापले. त्यांनी आपल्या समोरचा काचेचा जडजूड 'पेपरवेट' ध्वनिक्षेपण यंत्रणा सांभाळणाऱ्या तंत्रज्ञाच्या दिशेने भिरकावला होता. त्यावेळी विधानसभा अध्यक्ष असलेले बाळासाहेब भारदे यांनी सभागृहात निर्माण झालेल्या तणावाला कौशल्याने आणि धैर्याने हाताळले. धैर्याने यासाठी की जांबुवंतराव धोटे काहीही करू शकतात अशी त्यांची ख्याती होती. धोटे यांनी केलेल्या कृतीनंतर स्वाभाविकच त्यांच्याविरुद्ध मुंबईच्या पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होऊन अटकही झाली होती. हा विषय एवढ्यावर संपला नव्हता. विधानसभेने ठराव करून धोटे यांची आमदारकीच काढून घेतली होती. या घटनेनंतर विधानसभेत पुन्हा असे भारीभक्कम पेपरवेट ठेवायचे नाहीत, असा निर्णयही घेण्यात आला होता.

परंतु, काय ठेवायचे नाही, हे ठरविले तरी 'भान' ठेवायचेच, हे सदस्यांनी ठरवायचे असते. नाना पटोले यांना राजकारण आणि सांसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव असूनही त्यांच्यात सभागृहाच्या सदस्यासाठी आवश्यक असलेल्या परिपक्वतेचा अभाव असल्याचे या घटनेत दिसले. विरोधकांनी सरकारच्या विरोधात बोललेच पाहिजे. आक्रमक झालेच पाहिजे. परंतु, सांसदीय लोकशाहीमध्ये सभागृहाची प्रतिष्ठा सांभाळण्याची जबाबदारी सत्ताधारी पक्षाएवढीच विरोधकांचीही असते, याचा पटोलेंना विसर पडला. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई झाली. मात्र, एकूणच सांसदीय परंपरेबद्दल सर्व सदस्य जागरूक होत नाहीत, साजेसे वर्तन करीत नाहीत, तोवर या कारवायांतून काहीही निष्पन्न होण्याची शक्यता नाही. विषय आणि परिस्थिती काहीही असली तरी सांसदीय परंपरांचे पालन ही सभागृहाची रीतच झाली पाहिजे. ▌

## तंत्रवेध

# फेक व्हिडीओची जटिल समस्या

**डॉ. दीपक शिकारपूर**

सोशल मीडियाचा वापर जगभर वाढू लागल्यावर त्यामध्ये काही समाजविघातक बाबी शिरणे अपरिहार्यच होते. सायबर गुन्हेगार इथेही सक्रिय झालेच. स्वतःचे खोटे प्रोफाईल ठेवून नोकरी, विवाह, प्रवास, व्यापार किंवा मैत्रीच्याही निमित्ताने लोकांना जाळ्यात ओढणे आणि पैशांना किंवा वैयक्तिक पातळीवरील इतर गोष्टींमध्ये ठगवणे हादेखील एक मोठा व्यवसाय बनला असे म्हणावे लागेल. याचीच पुढील आवृत्ती म्हणजे फेक न्यूज. याला होक्स असेही नाव आहे. अशा बातम्या कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. राजकारण आणि अर्थकारणापासून 'आज पृथ्वीवर सूर्याकडून कॉस्मिक रेजचा मारा होणार आहे तरी सावध राहावे'पर्यंत यामध्ये काहीही असू शकते. अशा बातम्यांना मसाला व्हॅल्यू असल्याने सोशल मीडियावर त्या झपाट्याने पसरतात. याचीच पुढची पायरी म्हणजे फेक व्हिडीओ. समाजमाध्यमांमार्फत 'व्हायरल' झालेल्या फोटो किंवा व्हिडीओवरून गैरसमज होऊन भांडणे, हिंसाचार, कोर्ट केसेस आणि अगदी दंगली उद्भवणे आता नवीन राहिलेले नाही. आपण पाहिलेला फोटो किंवा व्हिडीओ अस्सल आहे की मॉर्फिंग केलेला म्हणजे संगणकीय साधने वापरून सोयीस्कररीत्या कट-पेस्ट केलेला आहे, याची खात्री न करताच पाठिंबा किंवा विरोध करण्याच्या हालचाली सुरू केल्या जातात. पण सध्या काय सांगितले आहे यापेक्षा ते कोणी सांगितले, यालाच महत्त्व आलेय. हा बहुधा मानवी स्वभावच असावा, कारण 'फेक' की 'रिअल' याची खात्री करण्याची सुविधा फुकट देणारी अनेक ॲप हाताशी असतानाही आपण तसे न करता घातक आणि चुकीचे कृत्य करून मोकळे होतो. वर्णनावरून चित्र काढण्याचे जे कौशल्य आपल्यातील काहींमध्ये असते; त्याचाच हा अधिक उच्च पातळीवरचा तांत्रिक आविष्कार आहे.

सोशल मीडिया, विविध ॲप्स, ओटीटी, फार काय, टीव्हीवर दाखवली जाणारी दृश्ये किंवा प्रसंग त्यांच्या मूळ रूपात असतीलच याची कोणतीही खात्री प्रेक्षकांना मिळू शकणार नाही आणि हे घडायला पुढची पाच ते दहा वर्षे पुरेशी आहेत. पण येत्या काही दशकांमध्ये हा प्रकार वाढत जाण्याचीच शक्यता आहे, कारण असे व्हिडीओ बनवण्यातला आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा सहभाग वेगाने वाढत असल्याने दाखवली जाणारी बाब खरी की खोटी हे ओळखणे जवळजवळ अशक्य बनणार आहे. अमेरिकेचे माजी अध्यक्ष ट्रम्प यांना अटक होताना, फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रॉ अश्रुधुरातून मार्ग काढताना दिसणारे प्रसंग पाहिल्याचे किंवा याबाबत वाचल्याचे आठवत नाही ना? नाहीच आठवणार, कारण असे काही घडलेलेच नाही. हे प्रसंग संगणकावर बनवलेले आहेत. कृत्रिम प्रज्ञेवर आधारित 'मिडजर्नी' नावाच्या सॉफ्टवेअरने. पुरवलेल्या मजकुरावरून हे सॉफ्टवेअर प्रतिमा तयार करू शकते आणि त्या प्रतिमा किती हुबेहूब आहेत असेच वाटत राहते.



कृत्रिम बुद्धिमत्ता हे तंत्रज्ञान पुढील वीस वर्षांमध्ये जगाचे चित्रच बदलून टाकणार आहे. वैद्यकीय, शिक्षण, दूरसंचार आदी अनेक क्षेत्रांमध्ये या तंत्रज्ञानाचा प्रवेश झाला आहे. फेक व्हिडीओ किंवा डीपफेक व्हिडीओ हे कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून तयार केलेले व्हिडीओ असतात, ज्यात व्यक्तींचे चेहरे, आवाज किंवा हालचाली खोटेपणाने बदलल्या जातात. मनोरंजन, जाहिरात, शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात या तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे, परंतु त्याचा गैरवापरदेखील होऊ शकतो. जनरेटिव्ह एआय टूल्स वापरकर्त्याच्या प्रॉम्प्ट (यूजर इनपुट) नुसार माहितीचे पृथक्करण करून नवनिर्मिती करतात. त्यातून निर्माण होणारी बाब मानवनिर्मित नाही हे स्पष्ट करण्याचे बंधन नसल्याने त्याच्या सत्यतेवर सर्वांचा विश्वास बसू शकतो. एआय बनावट परंतु वास्तविक दिसणाऱ्या प्रतिमा आणि व्हिडीओंची निर्मिती करून चुकीची माहिती सर्वत्र प्रसारित करू शकतात. यामागे प्रतिगामी, गुन्हेगारी, दहशतवादी अथवा व्यावसायिक स्पर्धक असू शकतात पण, ते पाठीमागे राहून शांतपणे अदृश्य राहू शकतात. त्यामुळे जनमताचा प्रभाव सहज शक्य आहे.

डीपफेक व्हिडीओ तयार करण्यासाठी वापरली जाणारी प्रमुख एआय टूल्स अलिकडे चर्चेत आहेत. यापैकी 'डीपफेसलॅब' हे एक ओपन-सोर्स टूल आहे. ते वापरकर्त्यांना व्हिडीओमधील चेहऱ्यांचे स्वॅप करण्याची सुविधा देते. हे टूल उच्च अचूकतेसाठी ओळखले जाते आणि व्यावसायिकांमध्ये लोकप्रिय आहे. यात रिअल-टाईम प्रिव्ह्यू आणि बॅच प्रोसेसिंगसारखी वैशिष्ट्ये आहेत. रिफेस हे असेच एक मोबाईल ॲप्लिकेशन आहे. ते वापरकर्त्यांना त्यांच्या चेहऱ्यांचे व्हिडीओ आणि जीआयएफमध्ये स्वॅप करण्याची सुविधा देते. यात रिअल-टाईम चेहरा स्वॅपिंगची क्षमता आहे आणि सोशल मीडियावर सहज शेअर करता येते. डीप ब्रेन हे एक एआय व्हिडीओ जनरेटर आहे जे टेक्स्ट-टू-व्हिडीओ, टेक्स्ट-टू-ऑडिओ आणि एआय अवतार तयार करण्याची सुविधा देते. यात ८०पेक्षा जास्त भाषांमध्ये व्हॉईसओव्हर तयार करण्याची क्षमता आहे. यामुळे व्हिडीओ निर्मिती वेगवान आणि कार्यक्षम होते. याखेरीज मेकफिल्म हे एक व्यावसायिक डीपफेक व्हिडीओ मेकर आहे. ते एथिकल कंटेंट निर्मितीसाठी डिझाईन केले आहे. यात चेहरा स्वॅपिंग, व्हॉईस जनरेशन, व्हिडीओ डाऊनलोड आणि व्हिडीओ आऊटपुट सारखी वैशिष्ट्ये आहेत. ही ॲप्स वापरताना सुरक्षित आणि नैतिक वापरासाठी सूचना घेणे आवश्यक आहे. एखाद्याच्या चेहऱ्याचा किंवा आवाजाचा वापर करण्यापूर्वी त्यांची स्पष्ट परवानगी घेणे अपेक्षित असते. व्हिडीओंमध्ये वॉटरमार्क्स वापरून ते एआयनिर्मित असल्याचे स्पष्ट करणे अपेक्षित होते. या प्रकाराला, खरे तर गैरप्रकाराला वेळीच आळा न घातल्यास अराजक घडू शकते. परिणामी, सत्य लपवणे, ते वेगळ्या रूपात दाखवणे किंवा स्वतःला सोयीचा असेल तेवढाच भाग सांगणेही अगदी सहजशक्य होईल. यामध्ये प्रगत राष्ट्रांमध्ये उहापोह होऊन जागृती झाली आहे. १ ऑगस्ट २०२४ रोजी, युरोपियन कृत्रिम बुद्धिमत्ता कायदा अंमलात आला. नवीन नियमांचा एक भाग म्हणून कायदा प्रतिबंधित अस्वीकार्य पद्धतींची यादी तयार करतो, ज्यामुळे धोका वाढतो. या प्रतिबंधाचा उद्देश लोकांच्या सुरक्षेसाठी अस्वीकारार्ह पातळीचा धोका असलेल्या क्षेत्रावर किंवा अनाहूत भेदभाव करणाऱ्या प्रणालींवर आहे. आपल्या देशातही या विषयावर मंथन सुरू आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकास आणि वापरासाठी स्पष्ट धोरण तयार करणे आवश्यक आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेचे नियमन करण्यासाठी एक स्वतंत्र नियामक संस्था स्थापन करणे आवश्यक आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्य म्हणजे काय याची कायदेशीर व्याख्या करण्याची वेळ आली आहे. यासाठी सरकार आणि स्वयंसेवी संस्थांनी खरेपणा तपासण्यासाठी काही वेबसाईट्स तयार करणे जरुरीचे आहे. तसेच सायबर कायदे बदलून त्यात फेक न्यूज, व्हिडीओचा प्रसार करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना जबर शिक्षा व्हायला हवी. हे सर्व प्रकार फक्त राजकीय अथवा देशांमधील स्पर्धेपुरतेच नाहीत. उद्योगविश्व यापासून अलिप्त राहू शकत नाही. उद्योग आपले उत्पादन लोकप्रिय आणि अधिक लाभदायी करण्यासाठी स्पर्धक उद्योगांबद्दल गैरसमज, फेक माहिती सोशल मीडियावर पसरवू शकतो. व्यवसायाचा हेतू फक्त लाभ असाच असता कामा नये. हे बाळकडू शालेय शिक्षणपद्धतीत, व्यवस्थापन उच्च शिक्षणात अंतर्भूत केलेच पाहिजे. नीतिमत्तेवर आधारित तंत्रज्ञान ही बाब शालेय, महाविद्यालयीन शिक्षणात अंतर्भूत करायची हीच वेळ आहे. ▌

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

# गडचिरोलीच्या विकासाची नवदिशा

**नंदकिशोर काथवटे**

महाराष्ट्राच्या नकाशावर गडचिरोली जिल्ह्याला नेहमीच दुर्गम, नक्षल प्रभावित आणि मागास अशी ओळख चिकटली होती. घनदाट जंगल, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, सांस्कृतिक आणि जैवविविधतेने समृद्ध असतानाही या जिल्ह्याला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात शासन यंत्रणा आजवर कमी पडली, हे स्पष्ट आहे. सामाजिक पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत क्षेत्रांत गडचिरोलीने मोठी तफावत अनुभवली. मात्र, आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी घेतल्यानंतर या जिल्ह्याकडे एक नवे प्राधान्य दिले गेले आहे. नुकत्याच नागपूर येथे झालेल्या महास्ट्राईड परिषदेच्या मंचावर जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी गडचिरोलीसाठी तयार केलेला विकास आराखडा सादर केला. नव्या दृष्टिकोनातून गडचिरोली आकांक्षांपासून कृतीकडे या संकल्पनेतून सादर झालेला हा आराखडा जिल्ह्याला आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक स्तरावर झपाट्याने उभे करण्याचा स्पष्ट रोडमॅप दाखवतो.

सध्या गडचिरोलीचे एकूण जिल्हा उत्पन्न सुमारे १०,९२१ कोटी असून २०२८ पर्यंत ते तब्बल २७,३०३ कोटींवर नेण्याचे उद्दिष्ट या आराखड्यात ठेवले आहे. याचप्रमाणे प्रतिव्यक्ती उत्पन्न सध्याच्या १,४०,८६० वरून २०२८ पर्यंत दुप्पट म्हणजे २,८०,३२० करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. इतकेच नव्हे, राज्याच्या एकूण सकल उत्पन्नात गडचिरोलीचा सध्याचा ०.४५ टक्के वाटा ०.७ टक्क्यांपर्यंत नेण्याचे लक्ष्यही महत्त्वाचे ठरते. जिल्हाधिकारी पंडा यांच्या मते, या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी जिल्ह्यातील संसाधनांचा समन्वयित वापर करणे आवश्यक आहे. खनिज संपत्ती, विशेषतः लोहसंपत्ती, वनउपज, सेंद्रिय शेती, मत्स्य व्यवसाय, पर्यटन या क्षेत्रांना एकत्रित चालना देऊन उत्पन्न वाढीला गती देता येईल. कोनसरी येथील लॉयड्स मेटल्सचा लोह प्रकल्प तसेच लवकरच सुरू होणारा जेएसडब्ल्यू प्रकल्प जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगार निर्मितीचा मोठा आधार ठरतील. या उद्योगांच्या माध्यमातून व्यवसाय, वाहतूक, सेवा क्षेत्रातही रोजगाराच्या संधी तयार होतील.

गडचिरोलीसारख्या जिल्ह्यात उद्योग उभे राहत असताना स्थानिकांना विश्वासात घेणे, त्यांचे प्रशिक्षण, त्यांना सामावून घेणे हे शासनाचे कर्तव्य राहील. अन्यथा रोजगारासाठी बाहेरच्या मजुरांवरच अवलंबून राहण्याचा धोका निर्माण होईल. मुख्यमंत्र्यांना याची जाणीव ठेवूनच पुढील नियोजन करावे लागेल. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांचा गडचिरोलीसाठी वेगळा विचार करणे अपरिहार्य आहे. जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये आजही प्राथमिक शाळांचे वर्ग अपूर्ण आहेत, शिक्षकी पदे रिक्त आहेत, तर ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टर, औषधे यांचा तुटवडा आहे. यामुळे मुलांचे शिक्षण अपूर्ण राहते आणि आरोग्याच्या समस्यांमुळे लोक सतत असुरक्षित राहतात. या प्रश्नांवर एकाच वेळी आणि दीर्घकालीन उपाययोजनांनी काम केले तरच खरा विकास साधता येईल. गडचिरोलीत आजपर्यंत शासन योजनांच्या अंमलबजावणीत अनेक अडथळे आलेत. नक्षल चळवळ, सुरक्षेची समस्या, अधिकारी-कर्मचाऱ्यांची भीती आणि लोकांमधील अविश्वास या सर्वांनी जिल्ह्याला मागे खेचले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याच पृष्ठभूमीवर गडचिरोलीच्या समस्यांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला.

महास्ट्राईड परिषदेच्या निमित्ताने गडचिरोली हा संपूर्ण नागपूर विभागातून निवडलेला एकमेव जिल्हा ठरला. त्यामुळे राज्य शासनाची आणि जागतिक बँकेची विशेष नजर या जिल्ह्यावर केंद्रित झाली आहे. यातून आर्थिक तसेच तांत्रिक मदत मिळू शकते. जिल्हाधिकारी पंडा यांनी मांडलेले उद्दिष्ट आकडेवारीवरच नाही, तर प्रत्यक्ष अंमलबजावणीवर आधारित आहेत आणि त्यासाठी शासनाचा पाठिंबा, निधी आणि धोरणात्मक निर्णय यांची नितांत आवश्यकता आहे. आता गडचिरोली जिल्ह्यासाठी हा अत्यंत निर्णायक काळ आहे. राज्य शासनाचा, खासकरून मुख्यमंत्र्यांचा स्पष्ट राजकीय पाठिंबा, जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांची मदत आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आखलेला अभ्यासपूर्ण विकास आराखडा या तिन्हीचा योग्य मेळ घालता आला तर गडचिरोलीचे चित्र पूर्णपणे बदलू शकेल. महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात गडचिरोलीचा वाटा वाढवणे हीच या पुढाकारामागील खरी प्रेरणा आहे. मुख्यमंत्र्यांनी दाखवलेली सकारात्मकता, जिल्हाधिकाऱ्यांचे परिश्रम आणि जागतिक संस्थांचे सहकार्य याचे सुसंवाद, समन्वय आणि पारदर्शक व्यवस्थापन हेच गडचिरोलीच्या विकासाला खरे बळ देईल, यात शंका नाही. ▌

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# कर्नाटकातील सत्तासंघर्ष

**श्यामकांत जहागीरदार**

कर्नाटकमध्ये नेतृत्वबदल करण्याचा कोणताही विचार नाही, तशी प्रक्रियाही पक्षात सुरू नसल्याचा खुलासा काँग्रेस महासचिव आणि कर्नाटकचे प्रभारी रणदीप सुर्जेवाला यांनी केला असल्यामुळे कर्नाटकमधील काँग्रेसच्या सरकारमध्ये सर्व काही सुरळीत सुरू नाही, हे स्पष्ट झाले. काँग्रेस पक्षात काँग्रेस महासचिव मोठा की काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मोठे असा नवा प्रश्नही यामुळे उपस्थित झाला आहे. कारण दोन दिवस आधीच कर्नाटकमध्ये नेतृत्व बदल करायचा की नाही, याचा निर्णय काँग्रेसच्या नेतृत्वाला घ्यायचा आहे, त्यामुळे अन्य कोणी त्याबाबत बोलू नये, असे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी स्पष्ट केले होते. त्या बातमीची शाई वाळत नाही, तोच सुर्जेवाला यांनी राज्यात नेतृत्वबदल केला जाणार नसल्याचे सांगितले. त्यामुळे काँग्रेस पक्षातील अनागोंदीचा परिचय झाला. खडगे म्हणतात ते खरे की सुर्जेवाला म्हणतात त्यावर विश्वास ठेवायचा हे काँग्रेसच्या नेत्यांना कळेनासे झाले. कर्नाटकातील नेतृत्वबदलाबाबतचा निर्णय काँग्रेसचे नेतृत्व घेणार आहे, असे खडगे यांनी म्हटले. राज्यात नेतृत्वबदल होणार नाही, असे त्यांनी म्हटले नाही. याचा अर्थ काँग्रेस पक्षात खडगे राष्ट्रीय अध्यक्ष असले तरी त्यांच्या वरही एक नेतृत्व आहे आणि पक्षातील सर्व निर्णय हे नेतृत्वच घेत असते, हे दिसून येते. आपल्या विधानातून कोणताही निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही, असे खडगे यांनी अप्रत्यक्षपणे कबूलही केले, असे म्हणायला हरकत नाही.

राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये होता, तसाच पक्षांतर्गत सत्तासंघर्ष कर्नाटक काँग्रेसमध्येही आहे. देशातील ज्या दोन-तीन मोजक्या राज्यांत काँग्रेसची सत्ता उरली त्यात कर्नाटक हे राज्य आहे. कर्नाटकमध्ये सिद्धरामय्या सध्या मुख्यमंत्री असले तरी ते कितीकाळ मुख्यमंत्री राहतील हे त्यांनाही माहिती नाही. कारण सिद्धरामय्या यांच्या मंत्रिमंडळात सध्या उपमुख्यमंत्री असलेले डी. के. शिवकुमार मुख्यमंत्रिपदाचे दावेदार आहेत. २०२३ च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेत शिवकुमार आघाडीवर होते. राज्यातील काँग्रेसच्या विजयात त्यावेळी प्रदेश अध्यक्ष असलेल्या शिवकुमार यांचे मोठे योगदानही होते. पण अचानक शिवकुमार यांना मागे टाकत काँग्रेसच्या नेतृत्वाने सिद्धरामय्या यांना मुख्यमंत्री केले. त्यामुळे शिवकुमार नाराज झाले होते. ते बंड करतील, असे वाटत होते, पण बंड न करता उपमुख्यमंत्रिपदावर त्यांनी समाधान मानले. राजस्थानमध्येही काँग्रेसला बहुमत मिळवून देण्यात तेव्हा प्रदेश काँग्रेस अध्यक्ष असलेले सचिन पायलट यांची मोठी भूमिका होती. पण त्या राज्यातही काँग्रेसने अशोक गहलोत यांना संधी देत पायलट यांना उपमुख्यमंत्री बनवले होते, त्यामुळे तेव्हा पायलटही नाराज झाले होते.

कर्नाटकमध्ये मुख्यमंत्रिपदासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने अडीच-अडीच वर्षाचे सूत्र ठरवल्याची चर्चा त्यावेळी जोरात होती. म्हणजे पहिले अडीच वर्ष सिद्धरामय्या मुख्यमंत्री राहतील आणि नंतरचे अडीच वर्ष शिवकुमार मुख्यमंत्री होतील, असे काँग्रेस महासचिव के. सी. वेणुगोपाल आणि राज्याचे प्रभारी रणदीप सुर्जेवाला यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत ठरले होते, असे म्हणतात. मात्र आता त्याबद्दल कोणी बोलत नाही. सिद्धरामय्या यांच्या मुख्यमंत्रिपदाला यावर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात अडीच वर्ष पूर्ण होत आहे. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदलाची चर्चा सुरू झाली वा शिवकुमार यांच्या समर्थकांनी ती जाणीवपूर्वक सुरू केली, असे म्हणायला जागा आहे. काँग्रेस आमदार इकबाल हुसेन यांनी शिवकुमार यांना मुख्यमंत्री बनवण्याची मागणी करून खळबळ उडवली, एवढेच नाही तर राज्यातील काँग्रेसचे १०० आमदार शिवकुमार यांच्या पाठीशी असल्याचा दावा केला. त्यामुळे राज्यात नेतृत्वबदलाची चर्चा सुरू झाली.

राजस्थान आणि छत्तीसगडप्रमाणे कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनीही मुख्यमंत्रिपद सोडण्यास नकार दिला. राजस्थानमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री अशोक गहलोत यांच्या नेतृत्वाला तेव्हा उपमुख्यमंत्री असलेले सचिन पायलट यांनी आव्हान दिले होते. पण पायलट यांच्या बंडानंतरही गहलोत यांनी मुख्यमंत्रिपद सोडण्यास नकार दिला होता. एवढेच नाही तर पक्षांतर्गत पेचप्रसंगाच्या या स्थितीत काँग्रेसच्या नेतृत्वाने गहलोत यांची पाठराखण केली होती. अशीच स्थिती छत्तीसगडमध्ये उद्भवली होती. काँग्रेसला बहुमत मिळाल्यानंतर मुख्यमंत्रिपदावर सिंहदेव यांनी दावा केला होता. मात्र काँग्रेसच्या नेतृत्वाने भूपेश बघेल यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ घातली. अडीच वर्षांनंतर बघेल यांच्या जागेवर मुख्यमंत्री करण्याचे आश्वासन आपल्याला देण्यात आले होते, असे सिंहदेव म्हणत राहिले पण त्यांना कोणी दाद दिली नाही. अशोक गहलोत यांच्याप्रमाणे भूपेश बघेल यांनीही मुख्यमंत्रिपदाचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला. सचिन पायलट यांच्याप्रमाणे सिंहदेव यांना हात चोळत बसावे लागले, कारण या दोन्ही राज्यांत काँग्रेसच्या नेतृत्वाने पायलट आणि सिंहदेव यांना डावलत गहलोत आणि बघेल यांची पाठराखण केली होती.

शिवकुमार यांनी सध्या माघार घेतलेली दिसते. आपण सिद्धरामय्या यांच्यासोबत असून त्यांच्याशी आपले कोणतेही मतभेद नाहीत, असे शिवकुमार यांनी म्हटले. एवढेच नाही तर आपल्या समर्थक आमदारांना पक्षशिस्तीचे पालन करण्याची सूचनाही केली आहे. शिवकुमार यांची ही माघार स्थायी स्वरूपाची आहे की व्यूहरचनात्मक आहे, हे समजले नाही. मात्र शिवकुमार यांचा एकूणच आक्रमक पिंड पाहता ते माघार घेतील, असे वाटत नाही. मुख्यमंत्रिपद न मिळाल्यामुळे नाराज झालेल्या शिवकुमार यांची समजूत काढण्यासाठी काँग्रेसच्या नेतृत्वाने तेव्हा प्रदेश अध्यक्षपद त्यांच्याकडे कायम ठेवले होते.

कर्नाटकातील या सत्तासंघर्षात गृहमंत्री परमेश्वर यांनीही उडी घेतली होती. दलित नेता म्हणून मुख्यमंत्रिपदावर दावा केला होता. पण मध्यंतरी एका प्रकरणात अडकल्याने त्यांना फार काळ आपला दावा रेटता आला नाही. सिद्धरामय्या ओबीसी आहेत, बिहार विधानसभा निवडणुकीच्या आधी राज्यात नेतृत्वबदल केला तर ओबीसी मतदारांमध्ये चुकीचा संदेश जाईल, अशी सूचना पक्षातील काही नेत्यांनी केल्यामुळे सिद्धरामय्या यांना काही महिन्यांसाठी जीवदान मिळाल्याचे मानले जात आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेले खडगे कर्नाटकचे आहेत, त्यामुळे त्या राज्यातील पक्षांतर्गत राजकारणात त्यांचे सिद्धरामय्या यांच्याशी फारसे पटत नाही. याउलट शिवकुमार खडगे यांचे समर्थक म्हणून ओळखले जातात. राज्यातील नेतृत्वबदलाबाबत खडगे यांच्या विधानामागे ही पृष्ठभूमी आहे. त्यामुळे राजस्थान आणि छत्तीसगडमध्ये तेव्हा जे झाले, काँग्रेसच्या नेतृत्वाने जी भूमिका घेतली, त्याच इतिहासाची पुनरावृत्ती यावेळी कर्नाटकातही होणार का, काँग्रेसचे नेतृत्व सिद्धरामय्या यांच्या पाठीशी उभे राहणार की मुख्यमंत्री होण्याच्या शिवकुमार यांच्या स्वप्नाची पूर्तता करणार याकडे सगळ्यांचे लक्ष राहणार आहे. ▌

९८८१७१७८१७

### उबाठा, मनसे बुड नसलेले कमंडलू

विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात उबाठाद्वारे भाजपशी जे विश्वासघातकी राजकारण खेळले गेले होते. त्याला कोठेतरी छेद देण्यासाठी भाजपद्वारा मागील काही वर्षांपासून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला चुचकरणे चालू आहे. शिवसेनेचा इतिहास बघा. गेले ३० वर्ष भाजपबरोबर युतीमध्ये होती तरी त्यांनी काही वेळा युती पण तोडली आहे. विधानसभा निवडणूक २०१९ निकालानंतर उद्धव ठाकरे काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेससोबत गेले आणि मुख्यमंत्री झाले.

उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने सुद्धा वीस-पंचवीस वर्षांच्या राज्याच्या राजकारणात सातत्याने कोलांटउड्या मारल्या आहेत. लोकसभा २०१९ निवडणूक प्रचार दरम्यान मनसे प्रमुख राज ठाकरेंनी नरेंद्र मोदींविरुद्ध सातत्याने आग ओकली होती. आज उद्धव आणि मनसे या पक्षाचा अस्तित्वाचा प्रश्न आहे. बृहन्मुंबई महापालिका यांच्या हातून निसटली की यांच्या राजकारणाला घरघर लागणार आहे. आदित्य ठाकरे आणि अमित ठाकरेंना राजकारणात मर्यादा आहेत. आजच्या मराठी कुटुंबातील नवीन पिढीला मराठी भाषेशी तसेच मराठी विरुद्ध अभाषिक वाद याच्याशी काही देणे घेणे नाही. मराठी मुलांना प्रामुख्याने विकास पाहिजे आहे.

मराठी माणूस उबाठा आणि मनसे यांच्या राजकारणाला पूर्ण ओळखून आहे. गेली तीस वर्ष बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे आहे. मुंबईतील मराठी माणसासाठी यांनी काय केले हे सर्वांना दिसत आहे. भाजपने सुद्धा उबाठा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोघांमध्ये एक अंतर ठेवून राजकारण केले पाहिजे. कारण हे दोन्ही पक्ष केव्हा पलटी मारतील सांगता येत नाही.

आज उबाठा आणि मनसेला बृहन्मुंबई महानगरपालिकेची सत्ता पाहिजे. विधानसभा निवडणूक २०१९ च्या निकालानंतर उबाठाचा भाजपला आलेला अनुभव लक्षात घेता आता तरी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरेंबाबत जपून पाहून पावले टाकली पाहिजेत.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

## वाचक पत्रे

### पर्यावरण पूरक कागदी कप?

चहा, कॉफीसारख्या गरम पदार्थांसाठी कागद हो केवळ कागद, कोणतेही मायक्रो प्लॅस्टिक कोटिंग नसलेला, नरम पडून आकार बिघडणार नाही का? कितीही चांगल्या प्रतीचा, कोणतेही कोटिंग नसलेला कागद गरम पदार्थाने नरम पडणारच किंबहुना जर नरम पडणारच नसेल तर तो कागद निश्चितच पूर्णपणे विघटन होणारा नाही. अर्थात पर्यावरणपूरक कागदी कप अस्तित्वातच नाही. म्हणजेच तथाकथित कागदी कप पर्यावरणपूरक नाहीत. आणि कागदी कप विघटित होणारा मानले तरी तो सिंगल युजच. मग त्याचे विघटन होईपर्यंत आपल्या भोवती तो कचराच आहे ना. कचऱ्यात राहणाऱ्यांनो हीच का तुमची श्रीमंती, हाच का तुमचा हायजेनिक असल्याचा आव?

**धनंजय विश्वनाथ व्यास**/९४२२९५९४४०

### गुरुपौर्णिमेचे महत्त्व

गुरुपौर्णिमा हा उत्सव आषाढ पौर्णिमा या दिवशी साजरा केला जातो. यावर्षी गुरुपौर्णिमा १० जुलैला आहे. ईश्वराचे सगुण रूप म्हणजे गुरू. आणि गुरूंचे निर्गुण रूप म्हणजे ईश्वर. गुरू याचा अर्थ, 'गु' म्हणजे अंधकार आणि 'रु' म्हणजे अंधकाराला दूर करणारा, प्रकाशाकडे घेऊन जाणारा. गुरू नेहमी देवतुल्य मानले जातात. गुरू म्हणजे शिष्याला किंवा भक्ताला मायेच्या मोहजालातून अलगदपणे बाहेर काढून त्याच्याकडून, त्याच्या प्रकृतीनुसार साधना करून घेणारे. गुरू म्हणजे निरपेक्ष प्रेम, भरभरून दोन्ही हातांनी शिष्यांना विद्या देणारे. आषाढ पौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यास यांना सर्वश्रेष्ठ गुरू मानले जाते. आषाढ पौर्णिमेला व्यासांच्या शिष्यांनी पहिल्यांदा गुरुपूजन केले म्हणून त्याला व्यासपौर्णिमा म्हणतात. अध्यात्मात असो किंवा कुठल्याही शैक्षणिक क्षेत्रात असो गुरूंशिवाय तरुणोपाय नाही. आपल्या आयुष्यात योग्य वेळी, योग्य गुरू आले तरच आपले जीवन योग्य मार्गाने जाऊन ध्येय प्राप्ती निश्चित होते. मात्र त्यासाठी आपली पात्रताही तेवढीच असावी लागते. जन्मदाते आई-वडील पंख देतात. पण त्या पंखांना भरारी मारण्याचे बळ मात्र गुरूच देतात. शिष्याची गुरूंवरील श्रद्धा, निष्ठा, भक्ती, शरणागत भाव, आज्ञापालन हे जेवढे जास्त असेल तेवढी त्याची प्रगती जलद होते. आपल्याला असणारी सांसारिक आसक्ती ही केवळ साधनेनेच कमी होते. आपले षडरिपु हे फक्त गुरूंच्या मार्गदर्शनातच आपण कमी करू शकतो. अशा गुरूंविषयी कृतज्ञता म्हणून या दिवशी शिष्य हे गुरूंची पाद्य पूजा करतात आणि त्यांना मनोभावे गुरुदक्षिणा अर्पण करतात. ▌



**माधवी पत्की**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

पुरातत्त्व

# गौरांगपटणा : प्राचीन काळातील बंदर

गौरांगपटणा हे ख्यातनाम पुरातत्त्वीय स्थळ असून हे ओडिशातील चिल्का सरोवराच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रारंभिक ऐतिहासिक काळातील एक बंदर आहे. हे ऐतिहासिक बंदर गंजाम जिल्ह्यात आहे. बंगालच्या उपसागरापासून दूर असल्याने चिल्का सरोवरात गौरांगपटणा बंदरांसारख्या ठिकाणी जहाजांना सुरक्षित जागा उपलब्ध होती. गौरांगपटणाचे पुरातत्त्वीय स्थळ चार हेक्टर क्षेत्रात पसरलेले आहे. बंदराची जागा दोन टेकड्यांच्या मध्यभागी असून ते दूर अंतरावरून सहज ओळखता येते. या दोन टेकड्यांच्या मध्यभागी प्राचीन काळात पाण्याचा एक प्रवाह असल्याने तेथे नौका सुरक्षितपणे उभ्या राहू शकत असत; तथापि ओडिशातील प्राचीन अथवा मध्ययुगीन बंदराच्या यादीत गौरांगपटणाचा उल्लेख आढळत नाही. सध्या गौरांगपटणा हे मासेमारांचे छोटे गाव असून ते अलीकडच्या काळातील आहे.

सन २०१५ मध्ये उत्कल विद्यापीठातील किशोरकुमार बासा व डेक्कन कॉलेजमधील रबींद्रकुमार महंती यांनी गौरांगपटणा येथे उत्खनन केले. तसेच या उत्खननात कटकच्या रेव्हेन्शा कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. येथे चार ठिकाणी केलेल्या उत्खननात सुट्या विटा व जांभ्या दगडाचे काही तुकडे मिळाले असले, तरी कोणत्याही वास्तूचा अथवा बांधकामाचा पुरावा आढळला नाही. मातीची भांडी सर्वसाधारणपणे शिशुपालगड व ताळपाडा या प्रारंभिक ऐतिहासिक स्थळांवरील भांड्यांशी साम्य असणारी होती. मातीच्या भांड्यांमध्ये झाकणांना गुंडीप्रमाणे भाग असलेली भांडी वैशिष्ट्यपूर्ण असून ती प्रारंभिक ऐतिहासिक काळाची निर्देशक आहेत. मातीच्या भांड्यांवरून गौरांगपटणा येथील पहिली वस्ती इ.स.पू. सहावे ते तिसरे शतक या काळातील होती. वस्तीचा दुसरा कालखंड प्रारंभिक ऐतिहासिक असून गौरांगपटणाच्या बहुतेक सर्व भागांत या काळात वस्ती होती. गौरांगपटणाला काही काळ वस्ती नव्हती. तिसरा व शेवटचा कालखंड मध्ययुगीन असून या स्तरांमध्ये मिळालेली मातीची भांडी माणिकपटणा येथे मिळालेल्या भांड्यांप्रमाणे होती.



मातीच्या भांड्यांमध्ये झाकणांना गुंडीप्रमाणे भाग असलेली भांडी वैशिष्ट्यपूर्ण असून ती प्रारंभिक ऐतिहासिक काळाची निर्देशक आहेत. मातीच्या भांड्यांवरून गौरांगपटणा येथील पहिली वस्ती इ.स.पू. सहावे ते तिसरे शतक या काळातील होती. वस्तीचा दुसरा कालखंड प्रारंभिक ऐतिहासिक असून गौरांगपटणाच्या बहुतेक सर्व भागांत या काळात वस्ती होती. गौरांगपटणाला काही काळ वस्ती नव्हती. तिसरा व शेवटचा कालखंड मध्ययुगीन असून या स्तरांमध्ये मिळालेली मातीची भांडी माणिकपटणा येथे मिळालेल्या भांड्यांप्रमाणे होती.

प्राण्याच्या अवशेषांमध्ये चिंकारा, काळवीट, चितळ, सांबर, बकरी यांची हाडे, अनेक प्रजातींच्या खाण्यायोग्य मृदुकाय कवची प्राण्याच्या शिंपल्यांचा, दोन प्रजातींच्या खेकड्यांच्या नांग्यांचा, ऑलिव्ह रिडले कासवांच्या पाठींच्या तुकड्यांचा व शार्क माशांच्या हाडांचा समावेश होता. त्यात मेरिट्रिक्स या प्रजातीचे शिंपले मोठ्या प्रमाणावर होते. तसेच समुद्रात आढळणाऱ्या समुद्री गाय या प्राण्याची हाडे मिळाली. गौरांगपटणाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे फाविया व हेलिओपोरा या दोन प्रवाळ प्रजातींचे तुकडे मिळाले. या प्रवाळ प्रजाती अंदमानजवळच्या समुद्रामध्ये आढळतात. या पुराव्यावरून असे दिसते की, गौरांगपटणा हे केवळ स्थानिक मासेमारांचे किनारी गाव नसून त्याचे बंगालच्या उपसागरातील व्यापाराशी संबंध असावेत. ●●






व्यक्तिमत्त्व

एक प्राचीन भारतीय आचार्य अशी सत्यकाम जाबाल याची ओळख आहे. त्याच्या आईचे नाव जबाला, म्हणून तो जाबाल. त्याची कथा छांदोग्योपनिषदात आलेली आहे. ती थोडक्यात अशी : गुरूकुलात ब्रह्मचर्याने राहून विदया संपादन करावी, अशी इच्छा असल्यामुळे सत्यकामाने आपल्या आईला ‘ माझे गोत्र काय ? ’ असा प्रश्न विचारला. कारण, ज्याचे कुलगोत्र माहीत आहे, त्याचेच उपनयन करून आचार्यांनी त्याला विदया दयावयाची, असा त्या काळात शिष्टाचार होता. जबाला आपल्या पुत्राला म्हणाली, ‘ तू कोणत्या गोत्रात जन्मलास हे मला माहीत नाही तुझा पिता कोण हेही मला माहीत नाही. माझ्या तरूणपणी मी परिचारिका होते, तेव्हा तुझा जन्म झाला. माझे नाव जबाला आणि तुझे सत्यकाम, त्यामुळे तू आपले नाव सत्यकाम जाबाल असे सांग ’, त्यानंतर सत्यकाम हा रिद्रूमत गौतम ह्या आचार्यांकडे गेला. आचार्यांनी त्याला त्याचे कुलगोत्र विचारल्यावर त्याने आईने त्याला जे सांगितले होते, तेच आचार्यांना सांगितले. सत्यकामाने खरे तेच सांगितल्यामुळे आचार्य त्याच्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी सत्यकामाचे उपनयन करून त्याला आपला शिष्य करून घेतले. त्यानंतर त्यांनी त्याला कृश झालेल्या चारशे गायी दिल्या आणि त्यांच्या मागून जाण्यास सांगितले. त्या गाईंसह तो अरण्यात आला आणि तेथे अनेक वर्षे केवळ कंदमुळांवर आपली उपजीविका करून त्याने त्या गायींचे पालन केले. यथावकाश त्या गायींची संख्या वाढून ती एक हजार झाली. त्यानंतर त्याला एका बैलाच्या वाणीत प्रवेश केलेला वायू , अग्नी, हंस (आदित्य) आणि मद्गु (पाण्याच्या आश्रयाने राहणारा एक रानटी पक्षी) ह्यांनी प्रत्येकी एक, ह्याप्रमाणे चार ब्रह्मपादांचे ज्ञान दिले. हे ज्ञान घेऊन आलेला सत्यकाम आपल्या हजार गायींसह आश्रमात येताच त्याला आचार्यांनी प्रेमाने हाक मारून म्हटले, ‘ तू मला ब्रह्मज्ञासारखा दिसत आहेस. तुला ब्रह्मोपदेश कुणी केला ? ’ त्यावर मनुष्यांखेरीज अन्य जीवांनी तो केला, असे सांगून सत्यकाम म्हणाला, ‘ परंतु आपण श्रेष्ठ आहात आपण माझी इच्छा पूर्ण करू शकाल. श्रेष्ठतम आचार्यांकडून प्राप्त झालेली विदयाच श्रेष्ठतम पदवीला पोहोचविते ’. गुरुशिवाय इतरांनी उपदेश करू नये आणि शिष्याने दुसरा गुरू करू नये, ह्या संकेताचे त्याने पालन केले. त्यानंतर आचार्यांनी तोच उपदेश त्याला पुन्हा केला. ब्रह्म हे सोळा कलांचे असून ते एकरस आहे, ही शिकवण त्यांनी दिली. सत्यकाम जाबाल षोडशकल ब्रह्माचा द्रष्टा झाला. सत्यकाम जाबालाचा निर्देश शतपथब्राह्मण,बृहदारण्यकोपनिषद, मैत्रायणी उपनिषद ह्या उपनिषदांतूनही आलेला आहे. ●●

इतिहास

# पांड्य; दक्षिण भारतातील प्राचीन राजवंश



दक्षिण हिंदुस्थानातील एक प्राचीन घराणे अशी पांड्य राजवंशाची ओळख आहे. पांड्य घराण्याचा व त्यांच्या प्रदेशाचा प्रथम उल्लेख अशोकाच्या लेखात येतो. दक्षिणेत चोल, चेर व पांड्य हे प्रदेश अशोकाच्या साम्राज्याच्या बाहेर होते. अशोकाने त्या प्रदेशांत मनुष्यांच्या तसेच पशूंच्या चिकित्सेची व्यवस्था केली होती आणि त्याकरिता औषधी वनस्पती लावण्याची काळजी घेतली होती. कालिदासाने रघुवंशात उरगपुरला (आताचे उरैपूर-तिरुचिरापल्लीजवळ) पांड्य राजा उपस्थित होता असे वर्णिले आहे तथापि या आरंभीच्या राजांविषयी आपणास फारशी माहिती नाही. त्यामध्ये नेडुं-जेळीयननामक राजाचे नाव संस्मरणीय आहे. त्याने चेर व चोल राजांचे आपल्या मदुराई राजधानीवरचे आक्रमण परतवून लावले. कोंगू आणि नीडूर येथील राजांचा पराभव केला. विद्वान व कवी यांना आश्रय दिला तसेच अनेक श्रौत याग केले, असे तद्विषयक गीतात म्हटले आहे.

सहाव्या शतकापासून ते नवव्या शतकापर्यंत, दख्खनमधील बदामी किंवा राष्ट्रकुटांचे चालुक्य, कांचीचे पल्लव आणि मदुराईचे पांड्य यांनी दक्षिण भारताच्या राजकारणावर वर्चस्व गाजवले. पांड्यांनी अनेकदा कावेरी (चोल देश), प्राचीन चेरा देश (कोंगू आणि मध्य केरळ ) आणि वेणाडू (दक्षिण केरळ), पल्लव देश आणि श्रीलंकेच्या सुपीक नदीच्या मुहानावर राज्य केले किंवा आक्रमण केले. नवव्या शतकात तंजावरच्या चोलांच्या उदयाबरोबर पांड्यांचा ऱ्हास झाला आणि नंतरच्या लोकांशी त्यांचा सतत संघर्ष सुरू होता. पांड्यांनी १३ व्या शतकाच्या उत्तरार्धात चोल साम्राज्याविरुद्ध सिंहली आणि चेरांशी हातमिळवणी केली जोपर्यंत त्यांना त्यांच्या सीमा पुन्हा वाढविण्याची संधी मिळाली नाही.

मारावर्मन पहिला आणि जटावर्मन सुंदरा पंड्या पहिला (१३ वे शतक) यांच्या काळात पांड्यांनी सुवर्णयुगात प्रवेश केला. चोल देशात विस्तार करण्यासाठी मारावर्मन पहिला यांनी केलेल्या काही सुरुवातीच्या प्रयत्नांना होयसळांनी प्रभावीपणे रोखले. जटावर्मन पहिला (१२५१) यांनी दक्षिण केरळमधील तेलुगू देशात (उत्तरेकडे नेल्लोरपर्यंत) राज्याचा यशस्वीपणे विस्तार केला आणि उत्तर श्रीलंकेचा प्रदेश जिंकला. कांची शहर पांड्यांची दुय्यम राजधानी बनले. होयसळ सामान्यतः म्हैसूर पठारापर्यंत मर्यादित होते आणि राजा सोमेश्वर देखील पांड्यांसोबतच्या युद्धात मारला गेला. मारावर्मन कुलशेखर पहिला (१२६८) यांनी होयसळ आणि चोलांच्या युतीचा (१२७९) पराभव केला आणि श्रीलंकेवर आक्रमण केले.

आंध्रांच्या दक्षिणेतील आक्रमणामुळे तमिळ प्रदेशाच्या उत्तर सीमेवरच्या कळवारनामक लोकांना दक्षिणेस स्थलांतर करावे लागले, त्यामुळे ही चोल व पांड्य राज्ये मोडकळून पडली. पुढे सहाव्या शतकाच्या अखेरीस कडुंगोन (५९०६२०) याने नवीन राजवंश स्थापला. या वंशाचा चौथा राजा अरिकेसरी मारवर्मा (परांकुश ६७०-७००) याने बदामीच्या पहिल्या विक्रमादित्याला पल्लवांबरोबरच्या युद्धांत साहाय्य केले. या राजांच्या पश्चिमेचे गंग आणि त्यांचे सम्राट बादामीचे चालुक्य यांच्याशी वरचेवर लढाया होत.



या वंशातील श्रीमार श्रीवल्लभ राजाने (८१५-६२) श्रीलंकेवर स्वारी करून तेथील राजधानी लुटली. त्याचा सूड लंकाधिपतीने पल्लवांच्या साहाय्याने पुढे काढला. त्यात राजपुत्र दुसरा वरगुणवर्मा सामील झाला होता. या घरभेद्याला पुढे सिंहासन मिळाले, पण पल्लवांचे स्वामित्व स्वीकारावे लागले.

यानंतर पल्लव इतिहासातून गेले पण पांड्यांना उत्तर सीमेवरील चोलांशी सामना देणे भाग पडले. परांतक चोलाशी केलेल्या युद्धात मारवर्मा द्वितीय राजसिंह याचा पराभव होऊन त्याला प्रथम लंकेत व नंतर केरळमध्ये आश्रय घ्यावा लागला. चोलांनी पांड्यांचा बराच प्रदेश खालसा केला आणि अशा रीतीने कडुंगोन याने स्थापिलेल्या पहिल्या पांड्य साम्राज्याचा अस्त झाला. पांड्य राजांनी राजेंद्र चोल, पहिला कुलोत्तुंग व तिसरा कुलोत्तुंग या चोल राजांच्या कारकीर्दीत पुन्हा डोके वर काढण्याचा प्रयत्न केला पण त्यांस यश आले नाही.

पुढे द्वितीय मारवर्मा सुंदर पांड्य (१२१६-३८) याने तिसऱ्या कुलोत्तुंगाचा पराभव करून आपले राज्य विस्तृत केले. त्यात आता तिरुचिरापल्ली आणि पुदुकोट्टई या उत्तरेच्या प्रदेशांचा समावेश झाला होता. याचा वंशज पहिला जटावर्मा सुंदर पांड्य (१२५१-६८) याने पांड्यांचे दुसरे साम्राज्य स्थापले. त्याने चेर, होयसळ व चोल राजांचा पराभव केला, लंकेवर स्वारी करून तिचा उत्तर भाग काबीज केला आणि काकतीय गणपतीचा पाडाव करून आपल्या साम्राज्याची उत्तर सीमा नेल्लोरपर्यंत वाढविली.

मारवर्मा कुलशेखर पांड्य (१२६८-१३०९) याच्या कारकीर्दीत मार्को पोलो हा परकीय प्रवासी पांड्य देशात आला होता. त्याने भारताची जगातील सर्वोत्कृष्ट देश म्हणून स्तुती केली आहे. कुलशेखर पांड्याला एक औरस आणि एक अनोरस असे दोन पुत्र होते. राजाने जटावर्मा वीर पांड्य या अनौरस पुत्राला गादी देण्याचे ठरविल्यामुळे औरस पुत्र जटावर्मा सुंदर पांड्य याने आपल्या पित्याचा खून करून गादी बळकावली पण वीर पांड्याने त्याला लवकरच पदच्युत केले. तेव्हा सुंदर पांड्याने मलिक काफूर याचे साहाय्य मागितले. त्याने ते मोठ्या आनंदाने देऊन दक्षिण भारताच्या टोकाकडील या शेवटच्या हिंदू राज्याची इतिश्री केली (१३१०).

इतर भारतीय राजांप्रमाणे पांड्यांनीही विद्या व कला यांना आश्रय दिला. त्यांच्या मदुराई राजधानीतील मीनाक्षीसुंदरम् देवालयाची रचना कलात्मक आहे. राज्यकारभारात पांड्यांनी एक नवीन सुधारणा केली. प्रत्येक राजा आपणाबरोबर आपल्या राजकुमारांनाही राज्यशासनाचा अधिकार देई. जटावर्मा वीर पांड्याच्या काळी त्याच्या चार पुत्रांनी त्याच्याबरोबर राज्यकारभारात भाग घेतल्याचे कोरीव लेखांत उल्लेख सापडतात. त्यामुळे काही परदेशी प्रवाशांचा असा ग्रह झाला होता की, पांड्य राज्याचे अनेक विभाग झाले पण वस्तुस्थिती तशी नव्हती.

पांड्य राजांनी काही गुहा खोदविल्या. सित्तन्नवासल, तिरुमलइपुरम येथील चित्रकला उल्लेखनीय आहे तथापि त्यांचा भर वास्तुशिल्पांवर अधिक होता. या काळात वास्तुशिल्पात गाभारा आणि शिखर किंवा विमान यांच्या रचनेत फारसा फरक पडला नाही मात्र अधिक लक्ष गोपुरांच्या बांधकामात केंद्रित झाले. गोपुरांची कल्पना प्राथमिक स्वरूपात असल्यामुळे गोपुरे फार उंच निर्माण झाली नाहीत पण त्यांच्यातील बोजडपणा जाणवतो. ती पहिल्या दोन मजल्यांपर्यंत आयताकारी व लंबरूप राहून वर लंबाला साधारणतः पंचवीस अंशाचा कोन करीत आणि पुढे सरळ किंवा अंतर्वक्र रेषेत निमुळती होत. त्याला मध्ये द्वार असे. या काळात मंदिरांच्या भोवती संरक्षणासाठी तट उभारू लागले. एवढेच नव्हे, तर हळूहळू मंदिर मध्यबिंदू कल्पून एकाबाहेर दुसरा अशी आयताकारी किंवा चौरस तटांची संख्या वाढत गेली. या काळातील श्रीरंगम्चे मंदिर फारच विस्तृत असून तेथे एकात एक सात प्राकार आहेत. मूर्तिशिल्पातील शिव, विष्णू, गणेश, द्वारपाल इ. शिल्पांवर पल्लव कलेचा मोठा प्रभाव पडलेला आहे.तिरुप्परंकुरम् येथील नटेश्वर, पार्वती, शिवगण, नंदी यांच्या मूर्ती प्रेक्षणीय आहेत. तद्वत् कळुगुमलई येथील शिव व त्याचा परिवार ही शिल्पेही लक्षणीय आहेत. येथे उमासहित शिव, मृदंगवादक, दक्षिणामूर्ती, नरसिंह, ब्रह्मा, विष्णू, स्कंद, चंद्र-सूर्य, सुरसुंदरी आणि टेकडीवरील गुहेतील पार्श्वनाथ, पद्मावती, अंबिका या सर्वांच्या मूर्ती सौंदर्यपूर्ण आहेत. उत्तरकालीन पांड्य शिल्पांपैकी मीनाक्षीसुंदरम् मंदिरातील छोट्या स्तंभावलीतील दोन पंक्ती प्रतिनिधीभूत आहेत, तसेच श्रीरंगम् मंदिर काही उत्तरकालीन पांड्य शिल्पेही प्रेक्षणीय आहेत. ●●

# अस्वस्थ बस्तरची नक्षलवादापासून मुक्तता

(पान १ वरुन)

सरपंच श्रीकलाम जोगा यांनी व्यक्त केलेल्या भावनेला कलमुद्दुल्ला या अन्य एका गावकऱ्यानेही पाठिंबा दर्शविला. त्यांनाही ते जुने काळे दिवस आठवले. कलमुद्दुल्ला म्हणतात, ‘‘जेव्हा माओवादी येथे मुक्तपणे फिरत होते तेव्हा त्यांच्यासमोर बोलण्याची देखील कोणाची हिंमत होत नव्हती. मग, आजच्यासारखे एकत्र येणे तर खूपच दूरची गोष्ट. परंतु आता संपूर्ण चित्रच पालटले आहे. सुरक्षा दलांनी माओवाद्यांमध्ये असा काही धाक निर्माण केला आहे की ते गावाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमतही करू शकणार नाहीत. सुरक्षा छावण्यांनी ते आता येथे येणार नाहीत हे सुनिश्चित केले आहे.’’

गावातील आणखी एक प्रमुख व्यक्ती जोरुलाल कोटवार यांनीही परिवर्तनाच्या या चित्राचे अधिक स्पष्टपणे वर्णन केले. ते म्हणाले, ‘‘गाव नक्षलमुक्त घोषित झाल्यानंतर गावाला विकास निधीअंतर्गत १.१० कोटी रुपये प्राप्त झाले. पूर्वी आम्ही केवळ कागदावरच पैशांबद्दल ऐकत होतो. मात्र, आता आम्हाला खरे काम होताना दिसत आहे. माओवाद्यांना पाठिंबा देणारे गावात कोणीही शिल्लक राहिलेले नाही. लोक एकत्र काम करीत आहेत,’’

ग्रामसभेतील एका आश्चर्यकारक घटनेचा उल्लेख करणे योग्य ठरेल. या सभेत महिला केवळ उपस्थितच नव्हत्या, तर त्या अतिशय स्पष्टपणे आपले विचार व्यक्त करीत होत्या. एकेकाळी त्या त्यांच्या घरापुरत्याच मर्यादित राहिल्या होत्या. पण आता त्यांनी आपल्या गरजा व मागण्या स्पष्टपणे मांडल्या. ‘‘आम्हाला चांगल्या शाळा, दर्जेदार आरोग्यसेवा हवी आहे तसेच आमच्या मुलांना नोकरी/व्यवसायाची संधीही मिळावी.’’



माओवाद्यांच्या पोलादी पकडीतून बाहेर पडलेल्या या महिलांनी बडेसट्टीच्या कथेत आणखी एक नवीन अध्याय जोडला आहे. मात्र, हे काही एका रात्रीत घडलेले नाही. शांतता, प्रगती, सहभाग, हे सर्व वर्षानुवर्षे एकत्रित प्रयत्नांनंतर साध्य झाले आहे.

**जगरगुंडामध्ये उगवली नवी पहाट**

सुकमापासून तीन तासांच्या अंतरावर असलेल्या जगरगुंडा या गावात आम्ही पोहोचलो. आम्ही गावात प्रवेश करताच, कृष्णकुमार सिंह यांनी पुन्हा जुन्या स्मृती जागविल्या. ते सांगतात. ‘‘आशियातील सर्वांत मोठा चिंचेचा बाजार याच ठिकाणी भरभराटीला आला. सर्व भागातून व्यापारी येथे येत असत. मात्र, जेव्हा नक्षलवादी हिंसाचार वाढला तेव्हा सर्व व्यवसाय-व्यापार ठप्प झाला. कोणीही येथे येण्याचे धाडस करीत नसत. व्यापार संपुष्टात आला, बाजारपेठा शांत झाल्या,’’ कृष्णकुमार यांच्या स्वरात दुःख होते. वर्षानुवर्षे, जगरगुंडाची गजबजलेली आर्थिक लय तुटली होती, भीती आणि हिंसाचारामुळे त्याची क्षमता नष्ट झाली होती. पण परिवर्तनाचे वारे पुन्हा या दिशेने वाहू लागले आहेत.

कृष्णकुमार सिंह म्हणतात, ‘‘नुकताच पूर्ण झालेला अरणपूर-जगरगुंडाचा रस्ता केवळ जंगलातून जाणारा एक मार्ग नाही तर हा रस्ता म्हणजे एक जीवनरेखाच आहे. नव्याने बांधलेल्या या रस्त्यामुळे चिंचेचा व्यवसाय करणारे व्यापारी परत येथे येऊ लागले आहेत,’’ जसजसे आम्ही पुढे जात होतो, ग्रामीण पृष्ठभूमीवर अनपेक्षितपणे नव्याने बांधलेल्या उंच व भव्य अशा बँकेच्या इमारतीकडे माझे लक्ष वेधले गेले. उत्सुकतेने, मी ड्रायव्हरला थांबायला सांगितले. आम्ही बँकेत शिरताच एका ग्राहकाने आम्हाला सांगितले की, १८ मे २०२५ रोजी मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी इंडियन ओव्हरसीज बँक (आयओबी) शाखेचे आभासी माध्यमातून उद्घाटन केले. हा या दुर्गम क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक दिवस होता. हा विकास बस्तरचे पुनरुज्जीवन करण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेचा पुरावा आहे. १२ गावांमधील १४,००० हून अधिक रहिवाशांसाठी, ही नवीन बँकिंग सुविधा केवळ आर्थिक सेवा देणारीच नसून यामुळे सामाजिक परिवर्तनालाही गती मिळणार आहे. नक्षलग्रस्त बस्तरमधील परिस्थिती सुधारत असल्याचे यामुळे सिद्ध झाले आहे. सरकारी कल्याणकारी योजनांचा लाभ स्थानिक नागरिकांना मिळत असल्याचेही यातून स्पष्टपणे अधोरेखित होते, जे पूर्वी आवाक्याबाहेर होते. २००१ मध्ये नक्षलवाद्यांनी ग्रामीण बँक लुटण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतर ती बंद करण्यात आली होती. तेव्हापासून, या दुर्गम भागातील आर्थिक क्रियाकलाप ठप्प झाले होते. मात्र, सुरू करण्यात आलेल्या इंडियन ओव्हरसीज बँकेमुळे पुन्हा येथील लोकांच्या स्वप्नांना नव्याने पंख फुटले आहेत. परिसरातील गावांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यात यामुळे मदत होणार आहे. ●●

*(ऑर्गनायझरवरून साभार)*

घरवापसी

कुलदीपसिंह

# १५ ख्रिश्चन कुटुंबांचा हिंदू धर्मात प्रवेश

सनातन धर्माचा महिमाच असा आहे की तो मार्ग भरकटलेल्या लोकांनाही आपल्या मुळांशी जोडतो. अशीच एक घटना बिहारच्या नवादा जिल्ह्यात घडली आहे. येथे १२-१५ कुटुंबातील ख्रिश्चन नागरिकांनी पुन्हा आपल्या मूळ हिंदू धर्मात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या लोकांना आमिष दाखवून, फसवून मिशनऱ्यांनी त्यांचे ख्रिश्चन धर्मात धर्मांतर घडवून आणले होते. मात्र, आता ते सगळे मूळ सनातन धर्मात प्रवेशले आहेत.

**काय आहे संपूर्ण प्रकरण?**

प्रकरण असे की, नवादा जिल्ह्यातील रोह ब्लॉकमधील समरीगड पंचायतीचे रहिवासी रविदास समाज औक महादलित समजले जाणारे मुसहर समाजाच्या लोकांनी घरवापसी केली आहे. आपण आधी हिंदू होतो, पण नंतर काही वर्षांपूर्वी ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या संपर्कात आलो. मिशनऱ्यांनी आम्हाला चांगले शिक्षण, अन्न, रहायला घर इत्यादी आमिषे दाखविली आणि आमचे धर्मांतर घडवून आणले. पण लवकरच आमचा भ्रमनिरास झाला. मिशनऱ्यांनी आमची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाही, असे या लोकांनी सांगितले. मिशनऱ्यांनी आमची दिशाभूल केल्याचे आमच्या लक्षात आले आणि पुन्हा मूळ सनातन हिंदू धर्मात परतण्याची तीव्र इच्छा मनात जागृत झाली, असेही मुसहर समाजाच्या या नागरिकांनी सांगितले. ही इच्छा पूर्ण करण्यासाठी त्यांनी हिंदू संघटनांशी संपर्क साधला. यानंतर हिंदू संघटनेच्या लोकांनी मंदिरात आयोजित एका विशेष सोहळ्यात त्यांना पुन्हा हिंदू धर्माची दीक्षा दिली. यावेळी होमहवन वगैरे होऊन शुचिर्भूत होऊन त्यांची घरवापसी प्रक्रिया पार पडली.



घरवापसी केलेले सर्व लोक समरीगड गावातील देवी मंदिरात जमले आणि सर्वांनी आपली चूक कबूल करून आमिषाला बळी पडून आपण ख्रिस्ती झाल्याचे सांगितले. गुरू गोविंदसिंग आमचे श्रद्धास्थान असल्याचे त्यांनी सांगितले. मोगलांनी त्यांच्या मुलांना भिंतीत चिणून मारले. पण त्यांनी इस्लाम स्वीकारला नाही. गुरू गोविंद सिंग यांच्याकडून प्रेरणा घेऊन आम्ही पुन्हा आमच्या मूळ सनातन धर्मात प्रवेशल्याचे रविदास व मुसहर समाजाच्या लोकांनी सांगितले. सनातन धर्म हा जगातील सर्वांत महान धर्म आहे, असेही ते म्हणाले.

सनातन हिंदू धर्म स्वीकारलेल्यांमध्ये दिलीप रविदास, भरत रविदास, कुंदन रविदास, वीरेंद्र रविदास, रवी रविदास, संजू रविदास, जगदीश रविदास, सौरभ रविदास, छोटालाल मांझी, चिंता देवी आणि तब्या देवी यांच्यासह दोन डझनहून अधिक लोकांचा समावेश आहे.

०००

# मुस्लिम युवकाने स्वीकारला हिंदू धर्म

**वाराणसी** : काशीमध्ये एका मुस्लिम तरुणाने स्वेच्छेने हिंदू धर्म स्वीकारून घरवापसी केली. धर्मांतरानंतर भोगाबीर लंका निवासी अब्दुल हकीम यांचा पुत्र महमूद आलम याने आपले नाव बदलून गुड्डू लाल असे ठेवले. धर्मपरिवर्तनानंतर आपण खूप आनंदी असल्याचे या तरुणाने सांगितले. सनातन धर्म स्वीकारण्याचा विचार गेल्या १० वर्षांपासून आपल्या मनात होता. सनातन धर्माकडे माझा ओढा सतत वाढत होता. अखेर आपण हिंदू धर्म स्वीकारून मनातली इच्छा पूर्ण केल्याचे महमूद आलम याने सांगितले. माझ्यावर कुणीही सक्ती केली नाही व हा निर्णय घेताना माझ्यावर कुठल्याही प्रकारचे दडपण नव्हते, असेही गुड्डू लाल याने सांगितले. आपण सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच धर्मांतर केल्याचे महमूद आलम ऊर्फ गुड्डू लाल याने सांगितले. घरवापसीपूर्वी मंत्रोच्चार आणि



हवनासह संपूर्ण वैदिक विधींनी सनातन धर्म स्वीकारण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

घरवापसी प्रक्रियेत गीतेची शपथ आणि अग्नीला साक्षी मानून महमूद आलमने सनातन धर्मात प्रवेश केला आहे. त्याच्या घरवापसीचा व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हा युवक आई-वडिलांपासून वेगळा राहत असून भोगाबीर लंका परिसरात दुकान चालवतो. वास्तविक आपण २५ ऑगस्ट २०२० रोजीच हिंदू धर्म स्वीकारला होता. याबाबत न्यायालयात अपील करण्यात आले. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात मधली तीन-चार वर्षे गेली. यासंदर्भात वृत्तपत्रात राजपत्रही काढण्यात आले. डिसेंबर २०२४ मध्ये धर्मांतराची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली. यानंतर मी घरी पूजाअर्चना करत असे. माझ्या मित्रांनी बीएचयूमध्ये घरवापसी निमित्त विशेष सोहळ्याचे आयोजन केले होते, असेही महमूद आलम ऊर्फ गुड्डू लाल याने सांगितले. ●●

**(पांचजन्यवरून साभार)**

# गावठी दारुचा अड्डा पोलिसांनी केला उध्वस्त

## २ लक्ष ७७ हजारांचा मुद्देमाल जप्त, कदीम जालना पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील अवैध धंद्यावर कारवाई करुन समुळ नष्ट करण्याचे मा. पोलीस अधीक्षक जालना यांनी आदेश दिले आहे. त्याप्रमाणे कदीम जालना पोलीस ठाणेकडे विशेष मोहीम राबवुन व छापा पथक तयार करुन त्यांना कदीम जालना पोलीस ठाणे हददीतील अवैध धंदे यांचेवर कारवाई करण्याचे आदेश आम्ही पोउपनि श्री. मोरे व त्यांचे पथक यांना दिले होते. त्याप्रमाणे दिनांक ०३.०७.२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजताचे सुमारास कैकाडी मोहल्ला परीसरात गावठी दारुचे सराईत गुन्हेगार महीला व पुरुष हे गुळ व नवसागर यांचे मिश्रीत रसायन सडवुन त्याव्दारे हातभटटी लावुन गावठी हातभटीची दारु तयार



करीत असल्याची माहीती पोलीस उपनिरीक्षक श्री. डी. एस. मोरे यांना मिळाल्यांने त्यांनी सदरची माहीती आम्हास कळविल्यानंतर आम्ही पोलीस ठाण्याकडील अधीकारी व अंमलदार यांचे दोन विशेष पथक तयार करुन त्यांचेसोबत १२.१५ वाजताचे सुमारास कैकाडी मोहल्ला येथे छापेमारी केली असता एकुण आठ ते दहा ठिकाणी चालु हातभटटी मिळुन आल्या आहेत.सदर ठिकाणी हजर असलेले आरोपी यांना ताब्यात घेवुन चालु हातभटटी व रसायन जागेवर तोडफोड करुन नाश करण्यात आले आहे. सदर आरोपीत यांचेविरुध्द बिट जमादार यांचे फिर्यादीवरुन एकुण ०३ गुन्हे नोंद करण्यात आले असुन आरोपी यांचे ताब्यातुन सुमारे ०२,७७,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. श्री. अजय कुमार बसंल, पोलीस अधीक्षक जालना, मा. श्री. आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक जालना, मा. श्री. अनंत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधीकारी जालना यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.जे.बी.शेवाळे, पोलीस निरीक्षक, कदीम जालना पोलीस ठाणे, पोउपनि / श्री. डी. एस. मोरे, पोहेकॉ/९३० एस.व्ही.राठोड, पोना / १४६४ बी. बी. गायकवाड, पोना / १४३१ के.ए.चेके, पोकॉ/८४३ गायकवाड, पोकॉ/५१४ मतीन शेख, पोकॉ/५९४ पठठे, महीला होगा/सपकाळ, गायकवाड, पठाण सर्व नेमणुक कदीम जालना पोलीस ठाणे यांनी केली आहे.

# अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करा अन्यथा रास्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



शहरातील फुलबाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणार्या रस्त्यावरील अतिक्रमणे हटवून हा रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात यावा अशी मागणी मोती मस्जिद व फुलबाजार परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त व पोलीस अधिक्षकांकडे केली आहे. तात्काळ रस्ता मोकळा न केल्यास येत्या पंधरा दिवसांनंतर रास्ता रोको आंदोलनचा ईशाराही देण्यात आला आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, फुल बाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणार्या मार्गावर नेहेमी वाहतुकीचा खोळंबा होतो. या मार्गावरील दुतर्फा असलेल्या दुकानदारांनी त्यांच्या दुकानांसमोर फेरीवाले, गाडीवाले व ईतरांना जागा देऊन रस्त्याची रुंदी कमी केलेली आहे. त्यातच खरेदीसाठी येणार्यांची वाहने ही रस्त्यातच लावली जात आहे. एकप्रकारे अतिक्रमण करुन व्यवसाय करण्यात येत आहे. याबाबीकडे जालना शहर महानगर पालिकेचे स्वच्छता निरीक्षक व वाहतुक शाखेचे अधिकारी-कर्मचारी हे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. यापुर्वी देखील या संदर्भात विविध तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. मात्र, त्याचा कोणतीही दखल अद्याप पर्यंत घेण्यात आलेली नाही. तात्पुरती दिखाव्यासाठी कारवाई केली जाते आणि पुन्हा परिस्थिती जैसै थे होते. या मार्गावरून मार्गक्रमण करतांना या भागातील नागरिकांसह इतर वाहनधारकांना त्रास होतो आहे. तसेच वाहतुकीच्या खोळंब्यामुळे हॉर्न आणि गाड्यांचे आवाज परिसरातील नागरिकांना बधिर करण्यागत होत आहे.

मोती मस्जिद येथे मुस्लीम समुदाय सामुहिक नमाज पठणासाठी नियमित येतात. यांना देखील या बाबींचा त्रास होतो आहे. तेथे पार्किंगची व्यवस्था नाही. मस्जिद समोर असलेल्या स्व. स्वातंत्र्यसेनानी अब्दुल रहेमान कुरैशी चौक आहे. या ठिकाणीही अतिक्रमण करण्यात आलेले आहे. फुल बाजार ते मोती मस्जिद मामा चौक कडे जाणार्या मार्गावरील व स्व. स्वातंत्र्यसेनानी अब्दुल रहेमान कुरैशी चौक परिसरातील अतिक्रमण तातडीने हटविण्यात यावे. व नेहेमीकरता रस्ता मोकळा करण्यात यावा. व जालना शहर महानगर पालिका स्वच्छता निरीक्षक व वाहतुक शाखेचे अधिकारी-कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. याशिवाय या ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही यासाठी कठोरात कठोर पाऊले उचलण्यात यावे. यासाठी मनपा आयुक्त व शहर वाहतुक शाखेस योग्य त्या सुचना देण्यात याव्यात व भविष्यात या मार्गावर पुन्हा अतिक्रमण करुन रस्त्याची रुंदी छोटी करण्याचा प्रयत्न केल्यास मनपा प्रशासन व वाहतुक शाखेस दोषी धरुन जबाबदार अधिकार्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनाचा गांभीर्याने विचार करुन तातडीने कारवाई करावी अन्यथा पंधरा दिवसांनंतर रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशाराही निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे. निवेदनावर फुलबाजार व मोती मस्जिद परिसरातील सर्व नागरिक तसेच व्यवसायिक मोती मेडीकल, अजंठा रेस्टारंट, सारा रेडीमेड, आरजी मोबाईल, महाराज शूज, पटेल शूज, लाट सहाब, नवाब शूज, आँचल, चौधरी कलेक्शन, महाराजा चष्मा घर, डिलक्स ब्रेड, अक्सा मेडीकल, भारत वॉचेस, श्रीमान श्रीमती, हिंद वॉचेस, गुरू रेडीमेड, समिर कॉम्पलेक्स, मो अब्दुल सत्तार डिंगोरा, सय्यद नजीर सय्यद युनुस, सय्यद फेरोज जागीरदार, सय्यद अशपाक सय्यद इशाक, नूर मोहम्मद खान, शेख मोजीब शेख दादामियाँ, शेख हबी शेख दादामियाँ, शेख अमिर अहेमद, अब्दुल अलिम साहा, अमीत रजा साहा, निसार ईसाक बागवान, इब्राहीम अहेमद शाह, मुनव्वर अली, ताहीर अली, एकबाल, समीर खान, फरहान खान, मो असलम मो उस्मानियाँ, परवेज आलम, फुसान कुरैशी, शेख नबी, शाहरूख सय्यद अलिम, आकाश देवावाले, हनीफ कुरैशी, सद्दाम शेख, फेरोज सय्यद, असलम खान, शाहेद खान, सय्यद रहेमान, अफरोज खान, रमेश तनपुरे, कृष्णा मिटकर, राहुल राऊत, संजय राऊत, बबलु खान, अकबर खान आदी शेकडो साक्षर्या आहेत.

# संक्षिप्त

## जुन्या पेन्शन करीता आर्त हाक आंदोलन- प्रा.विजय शिरोळकर

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य अंशतः अनुदान प्राप्त (२००५पुर्वी) शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेच्या वतीने जुन्या पेन्शन योजने करिता पावसाळी अधिवेशनात आंदोलनाची आर्त हाक संघटनेने दिली आहे. शासनाविरोधात हिवाळी अधिवेशन , आयुक्त कार्यालय पुणे आणि बजेट अधिवेशन मुंबई दरम्यान आंदोलने करण्यात आली होती. सदर आंदोलनाची कोणत्याही प्रकारची गांभीर्याने दखल घेतलेली नाही. या विरोधात आझाद मैदान येथे हजाराच्या संख्येने उपस्थित निदर्शने करणार असल्याचे शासनास पाठवलेल्या पत्राद्वारे इशारा देण्यात आला आहे.

मा. मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे सरकार असताना १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः म्हणजेच २००६ ला कमीत कमी ४० टक्के अनुदान प्राप्त अथवा घोषित झाले असेल अशा सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी यांना १३ ऑगस्ट २०२४ शासन परिपत्रकाप्रमाणे मा. आयुक्त पुणे यांच्या अध्यक्षतेखाली जुनी पेन्शन देण्याकरता समिती गठीत केली होती त्याची विना तोडफोड अंमलबजावणी करण्यात यावी. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने, तसेच मुंबई उच्च न्यायालयाने आदेशित केल्याप्रमाणे१०० टक्के अनुदानित शाळेत १नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदनित तुकडीवरील शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी यांना जूनी पेन्शन योजना लागू करावी. जुनी पेन्शन योजना लागू करण्याकरिता सुप्रीम कोर्टामध्ये शासनाने विना विलंब सकारात्मक शपथपत्र सादर करावे. सेवा उपदानाचा लाभ नियुक्ती दिनांक ग्राह्य धरून देण्यात यावे. खाजगी शाळेतील २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. विनाअनुदानित/अंशतःअनुदानित शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या न्यायिक असतानाही अन्याय झालेला आहे. सुरुवातीचे ८/१० वर्षे विनावेतन काम केले आहे. कित्येक शिक्षक बांधव लाभाविना मयत झाले आहेत, सेवानिवृत्त झाले आहेत, अत्यंत हालाकीमध्ये जीवन जगत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचा प्राधान्यक्रमाने विचार करण्यात यावा. वरील न्यायिक मागण्यांकरीता पावसाळी अधिवेशनात दिनांक सात व आठ जुलै २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे जुनी पेन्शन पीडित कर्मचारी बंधू भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन संघटनेचे राज्याध्यक्ष प्रा. विजय शिरोळकर यांनी केले आहे

## रहदारीचा रस्ता बाजार विक्रेत्यांनी अडविला!

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद/प्रतिनिधी**

जाफराबाद नगरपंचायत च्या अति दुर्लक्षपणामुळे बाजार विक्रेते हे घरमालकांच्या समोरील रस्त्यावर आपली दुकाने मांडून बसल्यामुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो म्हणून जाफराबाद पोलीस स्टेशन व नगरपंचायत ने ही दुकाने तेथे बसू नये म्हणून निवेदने दिले

जाफराबाद येथे मंगळवार व शुक्रवार असे आठवड्यातून दोन वेळेस बाजार भरतात गेल्या कित्येक वर्षापासून या बाजारात भाजीपाला व अन्य वस्तूंचे विक्रेते वाढलेले आहे मात्र नगरपंचायतने यांच्यासाठी कुठलीही व्यवस्था केलेली नाही तेव्हा बाजार विक्रेते मालकी हक्क असलेल्या घरा समोर रहदारीच्या रस्त्यावर आपली दुकाने मांडून रहदारीस अडथळा निर्माण करीत आहे ही दुकाने घराचे समोरच मांडल्यामुळे घरमालकांना साधे घरात जाण्या येण्यासाठी सुद्धा त्रास सहन करावा लागतो बाजार विक्रेत्यांची दिवसभर आरडा ओरडा करून आपला माल विकण्यासाठी स्पर्धा चालते या समोरील अडथळा निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्यांना समजावून सांगितल्यानंतर सुद्धा ते अरेरावीची भाषा करतात या रस्त्यावरून दोन चाकी चार चाकी वाहने चालवणे सुद्धा बंद झाले आहे परिणामी या घरातील एखाद्या व्यक्तीला दवाखान्यात न्यायचे तर मुख्य रस्त्यावर उचलून आणावे लागते वास्तविक नगरपंचायत च्या मुख्य बाजार विक्रीच्या ठिकाणी जागा रिकामी असून सुद्धा नगरपंचायत या बाजार विक्रेत्यांना तेथे बसविण्यासाठी असमर्थ ठरले आहे हा सारा त्रास या रस्त्यावरील घर मालकांना व रहदारी करणाऱ्या व्यक्तींना होत आहे ही बाजाराची दुकाने हटविण्यात यावी म्हणून पोलीस स्टेशन व नगरपंचायत ला तशा आशयाचे निवेदन दिले आहे या निवेदनावर रवी लोखंडे अनिल मुळे मोहन गौतम अनंत देशपांडे जीवन देशपांडे गोपाल ढाकिफळे विवेक मुळे शिवाजी आहेर विवेक काकडे मोहन मुळे यांच्या सह्या आहेत.

# कलावंतांच्या मानधनावरील स्थगिती रद्द करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**



मानधनासाठी जिल्ह्यातील काही कलावंतांची नुकतीच निवड झाली होती. परंतु या निवडीवर काही लोकांच्या आक्षेपावरुन उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांनी स्थगिती दिली आहे. यामुळे कलावंतातून नाराजीचा सूर उमटत आहे. ही स्थगिती रद्द करुन तत्काळ मानधन सुरु करावे, अशी मागणी लाभाथ्यर्थ्यांनी केली.

यासंदर्भात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राजश्री शाहू महाराज वृद्ध साहित्यिक कलावंत मानधन समितीची बैठक २४ एप्रिल २०२५ रोजी झाली होती. मागील तीन वर्षापासून शेकडो लोककलावंतांचे प्रस्ताव धूळखात पडून होते. या साठी लोककलावंतानी रास्ता रोको, उपोषण, सातत्याने निवेदन देणे असे संविधानिक पध्दतीने आंदोलने करण्यात आल्यानंतर समितीने वाद्य, गायन, गवळण आदी पारंपारिक पद्धतीने कलावंतांच्या मुलाखती घेऊन जिल्ह्यातील तीनशे कलावंतांच्या मानधनासाठी निवड करण्यात आली होती यासंबंधी कार्यकारी अधिकारी सांस्कृतिक कार्य संचालनालय यांनी जिल्हा प्रशासनाला पत्र पाठवून कलावंता संदर्भातील कागदपत्र बँक संदर्भातील माहिती तत्काळ पाठवण्याबाबत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना कळविण्यात आले होते परंतु त्या पत्राची कुठलीही दखल न घेता १९ जून २०२५ रोजी काही विशिष्ट लोकांच्या फायद्यासाठी व आक्षेपावरून निवड झालेल्या कलावंताच्या मानधनाला स्थगिती देण्यात आली. सदरील स्थगिती रद्द करुन लोककलावंताना मानधन सुरु करावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनावर अनेक कलावंतांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २५ हजार रुपये मदत करावी

## आमदार राजेश राठोड यांची विधानपरिषद सभागृहात आग्रही मागणी

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

आमदार राजेश राठोड यांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विधान परिषदेचे सभागृह दणाणून सोडले. अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी २५ हजार रुपये आर्थिक मदत करावी तसेच वीज कोसळून मृत्युमुखी पडलेल्या मंठा तालुक्यातील उमरखेडा येथील गौतम आसाराम जाधव व विजेचा शॉक लागून मृत्यूमुखी पडलेल्या दहा येथील शेतकरी व सैन्य दलातील जवान पवन शेषराव पवार यांच्या कुटुंबीयास प्रत्येकी दहा लाख रुपये आर्थिक मदत करावी अशी आग्रही मागणी आ. राजेश राठोड यांनी केली. महानायक माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीदिनी आ. राजेश राठोड यांनी शासनाकडे अनेक मागण्यांद्वारे सभागृहाचे लक्ष वेधून घेतले. कोणत्याही संकटात मदतीची अपेक्षा न करणाऱ्या शेतकऱ्यांना अतिवृष्टीने नुकसान झाल्यापोटी तात्काळ मदतीची घोषणा करून एक आठवड्यात शेतकऱ्यांना मदत मिळेल अशी व्यवस्था करावी तसेच मंठा तालुक्यातील उमरखेडा येथे वीज कोसळून गौतम आसाराम जाधव या शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्यांच्या तीनही मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी मी स्वतः स्वीकारली असून पेरणीसाठी बी - बियाणे व



खते उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सभागृहात सांगितले. मात्र, उमरखेडा येथील शेतकऱ्याच्या कुटुंबीयास मदत म्हणून चार लाख रुपयाचा धनादेश प्रशासनाने तयार केला असून अद्यापपर्यंत संबंधितास मिळाला नाही. कृषीदिनाच्या निमित्ताने शासनाने तात्काळ मदत करून अत्यल्प असलेल्या चार लाख रुपये ऐवजी दहा लाख रुपये आर्थिक मदत करावी अशी मागणी आमदार राठोड यांनी केली. मयत जवान पवन शेषराव पवार यांच्या नातेवाईकांना सुद्धा दहा लाख रुपये मदत करावी अशी मागणी केली.

# 'सुरवसें'च्या आर्शिवादाने सुरू असलेले अवैध धंदे 'सुदामा'च्या इंन्ट्रींने बंद

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**

गेल्या काहि महिन्यात परतुर शहरासह तालुक्यात अवैध धंद्यांनी मोठे तोंड वर काढले होते, या अवैध धंदे बंद करण्यात परतुर पोलिस ठाण्याचे तत्कालीन पोलिस निरीक्षक एम.टी.सुरवसे पुर्णपणे अपयशी ठरले होते, तालुक्यात अवैध धंद्यांनी नंगानाच सुरू केला होता, परंतु एम.टी.सुरवसे यांची बदली होऊन त्यांच्या जागी पोलिस निरीक्षक महणुन आलेले सुदाम भागवत यांनी पदभार स्विकारताच अवैध धंदे करणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्यास सुरूवात केल्याने अवैध धंद्यावाल्यांचे धाबे दणाणले असुन अवैध धंद्यावाले सध्यातरी बिळात गेल्याचे दिसून येत आहे.



परतुर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक महणुन रुजु झालेले सुदाम भागवत यांनी या अगोदर आपल्या कर्तव्याची छाप बदनापुर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक महणुन रुजु असतांना अख्या जिल्ह्याला दाखवुन दिली होती, कर्तव्याशी एकनिष्ठ असलेले सुदाम भागवत यांच्या कामाची दखल घेऊन पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी भागवत यांच्याकडे परतुर पोलिस ठाण्याची जबाबदारी दिली आहे. भागवत यांच्या अगोदर परतुर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक महणुन असलेले एम.टी.सुरवसे यांच्या कार्यकाळात परतुर शहरासह तालुक्यात अवैध धंद्यांनी नंगानाच मांडला होता, परंतु आता परतुर पोलिस ठाण्याचा पदभार सुदाम भागवत यांनी स्विकारताच अवैध धंद्यावाल्यांचे कंबरडे मोडण्याचे काम सुरू केल्याने अवैध धंद्यावाल्यांचे धाबे सध्यातरी दणाणले आहेत.



श्रीमती मिनू पी.एम. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना यांनी आज पदभार घेतल्यामुळे सत्कार करताना गटशिक्षणाधिकारी श्री.मनोज कोल्हे व शिक्षण विस्तार अधिकारी डॉ. रवींद्र काकडे.

# गावठी पिस्टल खरेदी विक्री करणारे जेरबंद

## एक पिस्टल व पाच जिवंत काडतुस जप्त, स्थानिक गुन्हे शाखा जालना यांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक ०२/०७/२०२५ रोजी मा. पोलीस अधिक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी सो यांनी जालना जिल्हयातील अवैध शस्त्रे गावठी पिस्टल बाळगणा-या इसमांचा शोध घेऊन विशेष मोहीम राबवुन कायदेशीर कार्यवाही करणे संदर्भात सुचना दिल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव सो यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करुन त्या बाबत सुचना देऊन मार्गदर्शन केले व पोलीस स्टेशन अंबड व घनसावंगी येथे दाखल असलेल्या पिस्टलच्या गुन्हयातील पाहिजे आरोपी समिर ऊर्फ उस्मान



शौकत सय्यद रा. पानेवाडी ता. घनसावंगी जि.जालना याचा शोध घेणे बाबत आदेशीत केल्याने त्याचा शोध घेत असतांना गोपनीय खबऱ्यांमार्फत माहिती मिळाली की, समिर ऊर्फ उस्मान शौकत सय्यद रा. पानेवाडी ता. घनसावंगी जि.जालना हा गांधीनगर येथे त्याच्या मित्राकडे येणार असल्याची माहीती मिळाल्याने सदर ठिकाणी जाऊन त्याचा शोध घेत असतांना समिर ऊर्फ उस्मान शौकत सय्यद वय २१ वर्षे, रा.पानेवाडी ता.घनसावंगी जि.जालना हा मिळुन आल्याने त्याची झडती घेतली असता त्याचे ताब्यात व कब्जात त्याचे कमरेला खोवलेली एक गावठी पिस्टल व ०५ जिवंत काडतुस मिळुन आले त्यास सदरचे पिस्टल व जिवंत काडतुस कोठुन आणले या बाबत विचारपुस केली असता त्याने त्याचा मित्र कुमार ऊर्फ राजकुमार भानुदास शिंदे रा. गांधीनगर जालना याचेकडुन खरेदि केली असल्याचे सांगीतल्याने आरोपी नामे कुमार ऊर्फ राजकुमार भानुदास शिंदे वय ३१ वर्षे रा.गांधीनगर जालना यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्याने काही दिवसापुर्वी सदचे पिस्टल व जिवंत काडतुस हे समिर ऊर्फ उस्मान शौकत सय्यद यास विक्री केले असल्याचे सांगीतले. सदर आरोपीतांना ताब्यात घेऊन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथे कलम ३/२५ आर्म अॅक्ट व मपोका कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी व मा.उप विभागीय पोलीस अधिकारी साहेब उप विभाग जालना श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. योगेश उबाळे, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रामप्रसाद पव्हरे, देविदास भोजने, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, कैलास खार्डे, इर्शाद पटेल, संदिप चिंचोले, संभाजी तनपुरे, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, अक्रुर धांडगे, रमेश काळे, धीरज भोसले, योगेश सहाने, सोपान क्षिरसागर चालक अशोक जाधवर, सौरभ मुळे सर्व स्थागुशा जालना यांनी केली आहे.

# मोफत वाळू धोरण घोषणेचा माहूर तालुक्यात उडाला फज्जा

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि.०३ जुलै -**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घरकुल धारकांना पर्यावरण विभागाच्या नियमांना बाजूला ठेवून थेट नदीपात्रातून प्रत्येक लाभार्थ्याला पाच ब्रास वाळू मोफत देण्याच्या घोषणेचा माहूर तालुक्यात साफ फज्जा उडाला आहे. शासनाची ही उदारमतवादी घोषणा तालुका प्रशासनाच्या नियोजन शुन्य अंमलबजावणीमुळे पोकळ ठरल्याने, अर्धवट बांधकाम झालेले तालुक्यातील १० हजारांवर घरकुलधारकांचे स्लॅबच्या घराचे स्वप्न वाळू अभावी मुंगेरीलाल के हसीन सपने ठरले आहेत. कोणीही वाली नसलेल्या घरकुलधारकांचे ऐण पावसाळ्यात घराविना संसार उघड्यावर आले असल्याने ही असहाय दयनीय अवस्था पाहून पडसा येथील व्यावसायिक शेख ईमरान शेख नवाब यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या मदतीला धावून आले असून, पैनगंगा नदी पात्रातून जेसीबी द्वारे विनामूल्य वाळू भरुन देण्याची तयारी दर्शवली आहे. यासंदर्भातील लेखी निवेदन त्यांनी दि. ०३ जून रोजी माहूर तहसीलदार मुगाजी काकडे यांना दिले असल्याने आता मोफत वाळू वाटपाचा नविनच पेच निर्माण झाला असून, महसूल प्रशासन यावर




काय निर्णय घेते याकडे घरकुल लाभार्थींचे लक्ष लागले आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विविध घरकुल लाभार्थ्यांना प्रती लाभार्थी पाच ब्रास वाळू मोफत देण्याची घोषणा केल्याप्रमाणे माहूर तालुक्यात रडतपडत या योजनेला ठरलेल्या डेडलाईनच्या शेवटच्या दोन तीन दिवसांत कागदी मुलामा देण्याचे केवळ सोपस्कार पार पाडण्यात महसूल प्रशासनाने धन्यता मानत स्वतःची पाठ स्वतःच थोपटून घेण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. विशेष म्हणजे १० हजार घरकुल लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी ५ ब्रास या प्रमाणे ५० हजार ब्रास वाळू उपलब्ध करून वाटप करण्याची गरज असताना प्रत्यक्षात जवळपास फक्त १०० ब्रास मोफत ? वाळू वाटप केली गेल्याने ऐण पावसाळ्यात घरकुलधारकांचे घराविना संसार उघड्यावर आले आहेत.शासनाची ही उदारवादी घोषणा तालुका प्रशासनाच्या नियोजन शुन्य अंमलबजावणीमुळे पोकळ ठरली आहे.

या सर्व घरकुलधारकांना मोफत तर सोडाच परंतु विकतचीही वाळू मिळाली नसल्याने सर्व घरकुलधारक उघड्यावर आले असून, परिस्थिती एवढी गंभीर आहे कि,अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी गेलेल्या नागरिकांवर सरकारी कामात अडथळ्याचे गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याने घरकुलधारक उघड्यावर राहत पावसात भिजने पसंत करत आहेत.

नियम व अटी दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या दंडेलशाही पुढे बोलणार तरी कोण? अशी परिस्थिती निर्माण झाल्याने पडसा येथील व्यावसायिक शेख इमरान शेख नवाब यांनी नदीपात्रातून घरकुलधारकांना जेसीबी द्वारे मोफत वाळू भरून देऊ अशी घोषणा केल्याने आता अधिकारी काय करतात याकडे संपूर्ण तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले आहे.

# नायगाव तालुक्यात वाळू माफिया विरोधात कारवाई

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०३ जुलै -**

लोहा, मुदखेड, नायगाव तालुक्यात मागील काही दिवसांपासून वाळू घाटाचे लिलावच झाले नसल्यामुळे चोरट्या मार्गाने वाळू उपसा करण्यासाठी वाळू माफियाची मोठी टोळी मारतळा, येळी, बरबडा येथे सक्रिय झाल्याने बिलोलीच्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे यांनी पथक तयार करून अवैध वाळू वाहतूक विरोधात जोरदार कार्यवाही सुरू केली आहे.

या मोहिमेअंतर्गत नायगाव तहसीलदाराने आज दि.३ जुलै रोजी गुरुवारी पहाटे वाळू माफीयांनी बोटीने व तराफ्यावर सक्शनपंपचा वापर करून वाळू चोरताना धाडसी कारवाई करत बरबडा वाडी परिसरातील गोदावरी नदी पात्रातून वाळू उपशाची यंत्रणा जप्त करुन पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. तर दि.२ जुलै रोजी दुपारी ३ च्या सुमारास गडगा -कहाळा रस्त्यावर अवैध वाळू घेऊन जाणारा हायवा टिपर क्रं एम.एच.२६ बी.ई. ९१९८ हा पकडून पुढील कारवाईसाठी नायगाव पोलीस ठाण्यात लावला आहे.

दरम्यान काळात येळी महाटी येथील वाळू माफिया हे गोदावरी नदीपात्रातून अवैध वाळू उपसा करण्याचा गोरख धंदा जोरदारपणे सुरू केला असून सदरील वाळू ही येळी वजीरगाव उमराफाटा कहाळा , गडगारोड , कहाळा नायगांव , नरसी , देगलूर



परीसरात विक्री करण्याचा सपाटा चालवला आहे. सदरील अवैध वाळू वाहतुकीला आळा बसवण्याच्या दृष्टिकोनातून बिलोली च्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे, यांच्या नेतृत्वाखाली नायगाव चा महसूल विभाग अक्टीव्ह मोडवर आला असून चार दिवसापूर्वी वजीरगाव रोडवर बिलोली च्या उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे आणि मंडळ अधिकारी रोहिदास पवार यांनी एक हायवा टिप्पर पकडून कुंटूर पोलीस ठाण्यात जमा केला तर आज दि.३ रोजी गुरुवारी पहाटे नायगावच्या तहसीलदार धम्मप्रिय गायकवाड यांनी बरबडा वाडी परिसरातील गोदावरी नदी पात्रातून वाळू उपशाची यंत्रणा जप्त करुन पुन्हा एकदा मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत नायब तहसीलदार सतीश कुलकर्णी, मंडळ अधिकारी एस.बी. आरु, काळे, चालक पुरी, तलाठी परमेश्वर कार्लेकर , हसनपल्ले हे होते. या कारवाईमुळे वाळू माफियांचे चांगलेच धाबे दणाणले असल्याची जोरदार चर्चा होतांना ऐकावयास मिळते आहे.

## संक्षिप्त वृत्त

### खंडीत असलेली हदगाव ते उमरी-भाटेगाव बस सेवा सुरु


**निवघा बा.-** तालुक्यातील हदगाव ते उमरी भाटेगाव येथे शालेय



विद्यार्थ्यांसाठी एस. टी.बस सेवा चालू करण्यात यावी अशी मागणी भाटेगाव येथिल सरपंच प्रतिनिधी नारायण शिंदे व निवघा बाजार येथिल राणी लक्ष्मीबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक मगर सर यांनी हदगाव आगार प्रमुख यांच्याकडे एका निवेदणाद्वारे केली होती या निवेदनाची तात्काळ दखल घेत येथिल बस सेवा २ जुलै पासून येथिल बस सेवा सुरळीत झाली आहे. हदगाव तालुक्याच्या सर्वात टोकाचे गाव म्हणजे उमरी भाटेगाव येथील शाळकरी विद्यार्थ्यांना या गावी बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे तालुक्याच्या ठिकाणी येऊन शिक्षण घेण्यासाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत होत. या ठिकाणी गेली अनेक वर्षापासून बस सेवा खंडित होती परिणामी येथिल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते ही बाब येथिल शालेय विद्यार्थ्यांनी सरपंच प्रतिनिधी नारायण शिंदे व मुख्याध्यापक मगर सर यांच्या निदर्शनास आणुन दिली त्याअनुसंगाने सरपंच प्रतिनिधी शिंदे व राणी लक्ष्मीबाई विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष मगर यांनी हदगाव आगर प्रमुखांची भेट घेऊन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सुविधेसाठी येथिल खंडीत असलेली बस सेवा तात्काळ सुरु करण्याची विनंती एका निवेदनाद्वारे हदगाव आगार प्रमुख यांच्याकडे केली.परिणामी हदगाव ते उमरी भाटेगाव बस सेवा सुरु झाली असून या बसने दररोज सुमारे ४० ते ५० प्रवासी प्रवास करत आहेत. येथिल ग्रामस्थांनी व शालेय विदयार्थ्यांनी आगार प्रमुख व मुख्याध्यापक मगर सर व सरपंच प्रतिनिधी नारायण शिंदे यांचे आभार व्यक्त केले आहेत

### किनवट येथे ६ जुलै रोजी गजर हरी नामाचा भजन सोहळा

**किनवट-** आषाढी एकादशीच्या निमित्ताने ६ जुलै २०२५ रोजी किनवट येथील श्री विठ्ठलेश्वर मंदिरात गजर हरी नामाचा भजन व



भक्तीगीतांचा विशेष कार्यक्रम रंगणार आहे. समस्त विठ्ठल भक्त परिवार, किनवट यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात नागपूरचे सुप्रसिद्ध भजन गायक अभिजित कडू आणि त्यांचा संच सुमधुर भक्तीगीतांनी भाविकांना मंत्रमुग्ध करतील. हा कार्यक्रम रात्री ७ ते १० या वेळेत होणार असून, सर्वांसाठी खुला आहे. आयोजकांनी भाविकांना सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

### डॉक्टर डे निमित्त देगलूर उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा सन्मान

**देगलूर-** डॉक्टर डे निमित्त उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांचा पत्रकार संरक्षण समिती, देगलूर यांच्या वतीने सन्मान करण्यात



आला. समाजाच्या आरोग्य रक्षणासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर, डॉ. मलशेटवार, डॉ. उस्मान सर, डॉ. काझी, डॉ. नुकुलवाड, डॉ. सचिन गायकवाड तसेच इतर डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सन्मान समारंभात डॉक्टरांना शाल व पुष्पहार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवणीकर यांनी पत्रकार संरक्षण समितीच्या या उपक्रमाचे कौतुक करत, संपूर्ण टीमचे आभार मानले आणि भविष्यातही असे उपक्रम राबवत राहावेत, अशी शुभेच्छा दिल्या. या वेळी पत्रकार संरक्षण समितीचे अध्यक्ष शेख असलम, सचिव गजानन टेकाळे, कार्याध्यक्ष धनाजी देशमुख, सहकार्यध्यक्ष धनाजी जोशी, संघटक श्वेता चिदमलवाड, सहसंघटक प्रभु वंकलवार, सदस्य इस्माईल खान, शेख अफन आदी उपस्थित होते.

# भाजपाच्या प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण यांच्या निवडीचा जल्लोष

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०३ जुलै -**



भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी आ.रविंद्र चव्हाण यांची बिनविरोध झाली यांचा मिठाई वाटुन आणि मोठ्या प्रमाणात अतिशष बाजी करुन जल्लोष साजरा करण्यात आला .

लोहा शहर भाजपाचे मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली बस स्थानक समोर फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करून कार्यकर्त्यांना पेढे भरवून आनंद साजरा करण्यात आला.

यावेळी भाजपाचे शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी. नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, माजी नगरसेवक बबनराव निर्मले, युवराज वाघमारे, नबी शेख,संदीप दमकोंडवार, अमोल व्यवहारे , भाजपाचे माजी तालुका उपाध्यक्ष नागनाथ पाटील चुडावकर, संजय चव्हाण डी.एन.कांबळे, यशपाल निर्मले, लक्ष्मी फुलवरे, सुधाकर सातपुते, बाळासाहेब कतुरे, शाहरुख शेख, आशिष व्यवहारे ,विनय चंदलवाड, यांच्यासह मोठ्या संख्येने भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेत ताकदीने उतरु: गजानन सुर्यवंशी**

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जिल्ह्यात माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली प्रचंड प्रमाणात विकास होत आहे. लाडकी बहिण, शेतकरी सन्मान योजना, प्रधानमंत्री आवास योजना या सह रस्ते,पुल,सभागृह आदी विविध विकास कामे भाजपा नेतृत्वाखाली सरकार करीत आहे. विधानसभेच्या निवडणुकाप्रमाणे आगामी न.प.,जि.प. या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजपला घवघवीत यश मिळेल जनता भाजपाच्या पाठिशी आहे असे भाजपचे शहर मंडळ अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी म्हणाले.

# पेन्शन अदालत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०३ जुलै -**

जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जुलै महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी ८ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

# वीस वर्षांपासून फरार आरोपीच्या लोहा पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि.०३ जुलै -**

लोहा पोलिस ठाणे हद्दीतील पोलेवाडी शिवारात चोरीच्या प्रकरणातील मागील वीस वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीच्या लोहा पोलिसांनी नाट्यमयरित्या दि. १ जुलै रोजी मंगळवारी बीड जिल्ह्यातून मुसक्या आवळल्या.

मागील सन २००५ मध्ये पोलेवाडी शिवारात चोरीची घटना घडली होती. सदर घटनेतील आरोपी मागील वीस वर्षापासून पोलिसांना सतत गुंगारा देत होते. गुप्त खबऱ्या मार्फत लोहा पोलिसांना आरोपी तुकाराम उर्फ श्रीमंत उत्तम काळे हा बीड जिल्ह्यातील सोनी जवळा ता. केज येथे असल्याची गुप्त माहिती मिळाली. पोलिस निरीक्षक नागनाथ आयलाने यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलिस उपनिरीक्षक शादुल शेख यांच्या नेतृत्वाखाली पो. कॉ. गुरुनाथ कारामुंगे, पो. कॉ. परशुराम लुंगारे आदी पोलिस पथक सोनी जवळा गावात पोहचले. मात्र पोलिसांना पहाताच तुकाराम उर्फ श्रीमंत उत्तम काळे हा पळून जात असताना त्याचा तब्बल दोन किमी अंतरा पर्यंत पाठलाग करून पोलिस अधिकारी शादूल शेख आणि टीम ने अथक प्रयत्नाने आरोपीस पकडले. गावातील त्याचे संबंधित मंडळींनी पोलिसांना घेराव घालण्याचा प्रयत्न केला मात्र लोहा पोलिसांनी त्याही परिस्थितीत सदर आरोपीच्या मुसक्या आवळल्या. सदर कार्यवाहीत युसूफ वडगाव पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक मांजरे, पो. कॉ. धनंजय कारले यांचे मोलाचे सहकार्य मिळाले. लोहा पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक शादुल शेख आणि कार्यवाहीत सहभागी पोलिस टीमचे जिल्हा पोलिस अधीक्षक अबीनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी अश्विनी जगताप यांनी कौतुक केले.

सदरील आरोपीस दि. २ रोजी बुधवारी लोहा न्यायालयात हजर केले असता त्यास चौदा दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली.

# कुंटूर - उमरी रस्त्याचे काम कासवगतीने

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि.०३ जुलै -**

नायगांव तालुक्यातील कुंटूर पासून बळेगाव मार्गे उमरी जाणाऱ्या रस्त्याचे काम मागील काही महीण्यापासून कासव गती ने सुरू असल्यामुळे दरम्यानच्या मान्सुनच्या आर्द्रता नक्षत्राच्या पावसात सदरील रस्त्याची दुरावस्था झाल्याचे दिसून येत आहे .



सदरील रस्ता सिमेंट काँक्रीटचा होणार आसल्याचे सांगण्यात येत असून हे काम राजसेतू कंसट्रक्शन पुणे यांच्या व्यवस्थापना खाली होत आहे मात्र सदरील गुत्तेदार हे आपल्या मनमानी पध्दतीने करण्याचा मार्ग अवलंबिला आहे त्यामुळे दरम्यानच्या पावसात रस्ता हा अनेक ठिकाणी चिखलमय झाला आहे त्यामुळे दुचाकी चार चाकी वाहनधारकांना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत आहे अनेक वेळा दुचाकी स्वार हे स्लीप होऊन रस्त्यावर पडत आहेत मात्र या रस्त्याच्या कामाची रेख - देख करणारे मारोती चंदापुरे ,अजय गुजर हे सदरील काम प्रगतीपथावर नेण्यासाठी कार्यशील नसल्याचे आढळून येत आहे त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी या कामी लक्ष घालून सदरील काम लवकरात लवकर पूर्णत्वास जाईल याची दक्षता घ्यावी व होणारा मोठा अपघात अशी मागणी या भागातील जनतेकडून जोर धरत आहे.

# गुंठेवारीला मुदत वाढ करावी : आ. बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि.०३ जुलै -**

ग्रामीण भागातील गुंठेवारी बंद असल्यामुळे जमिन खरेदी-विक्रीचे सगळे व्यवहार ठप्प आहेत . यातून अनेक समस्या निर्माण झाले असल्याने मालमत्ता धारकांना दिलासा देण्यासाठी ग्रामीण भागातील गुंठेवारीला मुदत वाढ देण्यात यावी अशी मागणी आ. आनंदराव बोंढारकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली.

पश्चिम मतदार संघातील विद्यमान आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी चर्चा करण्यात आली या चर्चेत ग्रामीण भागातील गुंठेवारी बंद असल्यामुळे जमिन खरेदी-विक्रीचे सगळे व्यवहार ठप्प आहेत . त्यामुळे ग्रामीण भागात विविध कारभार मोडकळीस आली आहे तेव्हा ग्रामीण भागातील बंद पडलेली गुंठेवारी त्वरित चालू करून तिची मुदत वाढ करण्यात यावी अशी मागणी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे



यांच्याकडे एका निवेदनाद्वारे करण्यात आली. दरम्यान महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या अनुषंगाने सकारात्मक पावले उचलली असून गुंठेवारीला मुदत वाढ देण्याच्या अनुषंगाने संबंधित विभागाला कळविले असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे लवकरच ग्रामीण भागातील गुंठेवारीचा प्रश्न मार्गी लागून मालमत्ता धारकांना मोठा दिल्यास मिळेल असा विश्वास ही आ. बोंढारकर यांनी व्यक्त केला आहे.

# माजी नगरसेवक वसंतराव माळोदे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि.०३ जुलै -**



वविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्यादित हदगांव या संस्थेचे विद्यमान उपाध्यक्ष तथा माजी नगरसेवक वसंतराव नागोराव माळोदे यांचे काल दिनांक ०२ जुलै रोजी रात्री दहा वाजता अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि. ०३ जुलै रोजी दुपारी एक वाजता मुळ गावी हदगांव येथील त्यांच्या मळ्यामध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातू नातवंडे असा परिवार आहे.


**नगर परिषद हदगाव, जिल्हा नांदेड**
**ई-निविदा क्र. -०१/२०२५**

जा. क्र.. २२२८/२०२५
दि. ०२/०७/२०२५-

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव च्या वतीने नोंदणीकृत व अनुभवी संस्था/कंपनी कडून निविदेतील नमूद कामाकरिता विहित वेळापत्रक नुसार फक्त मेरीट मुल्यांकन निवड पद्धतीचा अवलंब करून ई-निविदा मागविण्यात येत आहे. सविस्तर ई-निविदा सूचना खालील प्रमाणे आहे.

| निविदा क्र. | विभाग | कामाचे नाव | निविदा शुल्क | अनामत रक्कम | कामाचा अवधी |
|---|---|---|---|---|---|
| | कर विभाग | नगर परिषद हदगाव हद्दीतील संपूर्ण मिळकतीना (ईमारती म खुले भूखंड ) प्रत्यक्ष मिळकती पर जाऊन प्रत्येक मिळकतीला विशिष्ट क्रमांक नोंदविणे मिळकती वर जाऊन प्रत्येक मिळकतीचे मोजमाप करणे करण्यात आलेल्या मालमत्तेच्या प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे संगणकीय अद्यावातीकरण करून माहिती तयार करणे, फक्त) कर मुल्यांकन प्रक्रिया करीता मदत करणे कर मुल्यांकन प्रक्रिया करिता आवश्यक नमुन्यात माहिती प्रिंट करून आवश्यक स्टेशनरी व वायर्डिंग सह पुरविणे. | ५,००० (रु. पाच हजार फक्त ) | ६०,००० (रु. साठ हजार फक्त) | सहा महिने |

| अ . क्र. | विवरण | सुरु होण्याची तारीख व वेळ | अंतिम तारीख व वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करणे | ०३/०७/२०२५ संध्या. ०५.०० | १०/०७/२०२५ ला संध्या.०५.०० |
| २ | ऑनलाईन निविदा सादर करणे | ०३/०७/२०२५ संध्या. ०५.०० | १०/०७/२०२५ ला संध्या.०५.०० |
| ३ | तांत्रिक निविदा उघडणे | १५/०७/२०२५ स. ११.०० | कार्यालय न.प. हदगाव |
| ४ | आर्थिक निविदा उघडणे | १५/०७/२०२५ स.११.०० | कार्यालय न.प. हदगाव |

टीप:- कोणतेही कारण न देता एक अथवा सर्व निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.

**(गौरव बांडेकर)**
**मुख्याधिकारी, नगर परिषद हदगाव**


# नांदेड येथील रुग्णावर हृदयातील बेंटॉल शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०३ जुलै -**

नांदेड जिल्हयातील देळुब ता. अर्धापूर येथील रुग्ण पांडुरंग खराटे यांच्यावर यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे हृदयावरील यशस्वी बेंटॉल शस्त्रक्रिया सिव्हीटीएस सर्जन डॉ. विशाल खंते यांनी यशस्वीरित्या पूर्ण करत रुग्णास जिवनदान दिले

याविषयी सविस्तर वृत्त असे की नांदेड येथील प्रसिद्ध व ओम मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटल चे अस्थिरोग तज्ञ डॉक्टर अवधूत मोरे यांनी निदान करून पांडुरंग खराटे यांना यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथे संदर्भित केले.



सदरील रुग्णांना दम लागणे व चक्कर येणे ही लक्षणे होती. त्यांचे इकोकॉर्पिओग्राफी आणि सिटीस्कॅन केले असता हृदयातील नस फुगलेली आढळून आली. जिचा कधी पण फुटण्याचा धोका असू शकतो अशावेळी रुग्णा चा अचानक मृत्यू येऊ शकतो यावरून रुग्ण पांडुरंग खराटे यांनी वेळ वाया न घालवता यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद येथील तज्ञ डॉक्टर विशाल खंते यांची भेट घेऊन लवकरात लवकर सर्जरी करण्याचा निर्णय घेतला.

या शस्त्रक्रियेचे नाव बेंटॉल शस्त्रक्रिया आहे ही हृदयासाठीची सर्वात मोठी शस्त्रक्रिया आहे यामध्ये पूर्ण एओर्टा म्हणजे शरीराला रक्तपुरवठा करणारी नस बदलण्यात येते आणि हार्ट मधला एक वॉल बदलण्यात आला. सदरील शस्त्रक्रियेसाठी एकूण दहा तास कालावधी लागला.

एओर्टा ही हृदयातून उगम पावणारी एक मोठी धमनी आहे यात बेंटल प्रक्रियेद्वारे महाधमनी दोष दुरुस्त करत महाधमनीचा मूळ बदलून कोरोनरी धमनी पुनरावृत्ती करून बेंटॉल शस्त्रक्रिया पार पाडली. यामुळे मुख्यतः हृदयातील रक्त प्रवाह आणि ऑक्सिजनचा प्रवाह सुधारण्यास मदत होते.

यशोदा हॉस्पिटल सिकंदराबाद संदर्भातील अधिक माहीतीसाठी सहाय्यक व्यवस्थापकअनिल जोंधळे यांच्याशी ९१५४९ ९५४६३ किंवा किरण बंडे ९१५४१६७९९७ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण, पीसीपीएनडीटी, फ्लोरेसीस, मौखिक आरोग्य या आरोग्य विभागांच्या कार्यक्रमांसह, रुग्ण कल्याण समिती, १०८ रुग्णवाहिका, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य, आयुष्यमान भारत आदी योजना, आरोग्य विभागाकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात हा आढावा घेण्यात आला. यावेळी त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.उल्हास गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेशकुमार माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राऊत व डॉ. गंडाळ यांनी आरोग्य विभागांतर्गत सेवा देण्यात असलेल्या विविध सेवांचा तपशील यावेळी सादर केला. आरोग्य सेवा देत असलेले सर्व कार्यक्रम प्रमुख यांनी आपापल्या विभागातील कामकाजांबाबत सविस्तर माहिती सादर केली.

# आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये- आ.संदीप क्षीरसागर

## पोलीस, आरोग्य, एस.टी., महावितरण विभागाला दिल्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**



आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

### ई-पीक पाहणीस ०६ जुलैपर्यंत मुदतवाढ

#### पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंतची मुदत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगाम २०२४-२५ करीता सहायक स्तरावरील ई-पीक पाहणीसाठी ०६ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळवले आहे.ई-पीक पाहणीची प्रक्रिया वेळेत, अचूकपणे पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व महसूल, कृषी अधिकाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या आहेत. मंडळ अधिकारी यांना मोबाईल पद्वारे पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे, असेही त्यांनी कळवले आहे.

### विरोधकांच्या आरोपांना आ.संदीप क्षीरसागरांकडून प्रत्युत्तर

बीड (प्रतिनिधी) :- बीडमधील उमाकिरण शैक्षणिक संकुलात अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने राज्यभर खळबळ उडाली आहे. या प्रकरणाती आरोपी प्रा.विजय पवार हे बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांच्या जवळचे असून त्यांनी आरोपीना मदत केली असल्याचे आरोप अनेकांकडून करण्यात आले. परंतु आरोपी माझ्या जवळचे होते आहेत, हे मी मान्य करतो परंतु मी त्यांची अजिबात पाठराखण केलेली नाही आणि करणारही नाही. वेळ पडल्यास पीडितेला न्याय देण्यासाठी रस्त्यावर उतरू. असे सांगत आ.क्षीरसागरानी विरोधकांच्या बिनबुडाच्या आरोपांना प्रत्युत्तर देत सर्व आरोप खोडून काढले आहेत.

# लिटल स्टार प्रायमरी इंग्लिश स्कूल सिरसाळा येथे विश्वनाथ राठोड यांची वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

दिनांक ०३/०६/२०२५ गुरुवार रोजी सिरसाळा येथे लिटल स्टार प्रायमरी इंग्लिश स्कूल येथे महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री हरित क्रांतीचे प्रणेते महानायक स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून राष्ट्रसंत रामराव महाराज बंजारा सामाजिक परिवर्तन महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मा श्री विश्वनाथ जी राठोड यांच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते याप्रसंगी श्री विश्वनाथ राठोड यांनी मार्गदर्शनपर बोलत असताना स्वर्गीय वसंतरावजी नाईक साहेब यांच्या बालपणाच्या शाळेतील आठवणींना उजाळा देत महाविद्यालयीन शैक्षणिक जीवनापासून ते राजकीय जीवनापर्यंतच्या संपूर्ण घडामोडीवर नाईक साहेबांच्या कारकीर्दच्या काळी आठवणींना उजाळा दिला.

व नाईक साहेबांनी हरितक्रांती कशाप्रकारे घडून आणली व महाराष्ट्र राज्य हा कशाप्रकारे सुजलम सुफलाम् झालं हे सांगत होते.त्यावेळी उपस्थितीत शाळेचे संस्थापक अध्यक्ष श्री नामदेवजी गायकवाड सर श्री मधुसूदन अण्णा टेकाळे,आयुब भाई सय्यद, व अनिल उजगरे, शाळेतील शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रशासन आता गावात आले आहे , समस्या सांगा-उत्तर मिळेल-तहसीलदार शेळके

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

बीड तालुक्यातील समनापुर येथे पाली महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर सोमवार दि ३० जून रोजी राबविण्यात आले . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सकाळी आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे होते . नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , मंडळ अधिकारी सतीश बांगर , अव्वल कारकून राहुल कसबे , अमोल कणसे , महेंद्र राऊत , कोल्हारवाडी दत्त संस्थांनचे मठाधीपती श्रीहरी पवार महाराज उपस्थित होते . या कार्यक्रमाचे आयोजन पाली महसूल मंडळाच्या मंडळ अधिकारी शीतल चाटे व पाली महसूल मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी केले होते.



या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली . यामध्ये जिवंत सातबारा मोहीम , फार्मर आय डी , श्रावण बाळ योजना , संजय गांधी निराधार योजना डी बी टी करणे , नकाशावरील शेत रस्ते मोकळे करणे , त्यामुळे निर्माण होणारे वाद आपापसात सामंजस्याने मिटवून घेणे तसेच उपस्थितांना फार्मर आयडीचे महत्त्व त्यांनी पटवून सांगितले . आपल्याला फार्मर आयडीमुळे विविध योजनांचा लाभ घेता येईल , यामध्ये महसूल विभागाच्या सर्व योजना असतील , कृषी विभागाच्या योजना असतील तसेच इतर योजना असतील, याला फार्मर आयडी कंपल्सरी केलेला आहे . फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात साठवली जाईल , ज्यामुळे त्यांना कागदपत्रांकरीता हेलपाटे मारण्याची गरज पडणार नाही . तसेच त्यांनी उपस्थितांना जिवंत सातबारा मोहिमेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचे आवाहन केले व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपापला फार्मर आयडी काढून घेण्याचे देखील आवाहन केले .

# अंबाजोगाईच्या ऊसतोड मजुराच्या मुलाचा आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियन शिपमध्ये यशस्वी डंका

## राजकिशोर मोदी यांच्या वतीने आदित्यच्या यशाचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ जुलै**



अंबाजोगाई शहरातील मंगळवार पेठ भागातील रहिवाशी असलेल्या ऊसतोड कामगाराचा मुलगा चि. आदित्य दिलीप जाधव (वय १७) या तरुणाने एशियन चॅम्पियन शिप मध्ये रौप्यपदक पटकावत आपल्या उल्लेखनीय कामगिरीने अंबाजोगाई शहरासह संपूर्ण भारत देशाची मान उंचावली आहे. व्हिएतनाम येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्वर मेडल) पटकावून आदित्यने जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत अपार मेहनत, कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आदित्य जाधवने हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याची ही झेप केवळ वैयक्तिक नाही, तर लाखो गरीब घरातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.चि आदित्यची प्रेरणा इतर तरुण घेऊन अपार मेहनत तथा कष्टाने त्यांच्यासारखेच यश संपादन करून समाजाचे त्याचबरोबर आपल्या देशाचे नाव उज्वल करतील अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आदित्यचा सत्कार व सन्मान करतांना व्यक्त केली. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती ला दोष न देता त्याने केलेल्या कष्टाचे हे फलित असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे नुकताच आदित्य जाधवचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना राजकिशोर मोदी म्हणाले की अशा मेहनती, जिद्दी आणि संघर्षातून वर आलेल्या मुलांना वेळेवर योग्य दिशा आणि पाठबळ दिलं, तर तेभविष्यात देशाचं नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच उज्वल करतात. आदित्य सारख्या मुलांमधूनच नव्या भारताची उमेद आहे. त्याचे यश हे केवळ अंबाजोगाई शहरासाठीच नव्हे तर संपूर्ण भारत देशासाठी अभिमानास्पद बाब असल्याचे मोदी यांनी या सत्कार प्रसंगी नमूद केले. त्याच्याकडून भविष्यात देखील ऑलिम्पिक मध्येही पदक मिळवण्याची अपेक्षा आपण नक्की बाळगू शकतो असा विश्वास देखील राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला. यावेळी आदित्यच्या पालक, प्रशिक्षक व त्याच्या संपूर्ण टीमचे अभिनंदन व कौतुक राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

आपल्या सत्काराला उत्तर देतांना आदित्यने काटेकोर प्रशिक्षण, आहार, नियमित व्यायामासोबतच योग्य प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि स्वतःची प्रबळ इच्छाशक्ती यांच्या जोरावरच आपन हा यशस्वी प्रवास केला असल्याचे सांगितले.क्रीडा क्षेत्रात अडथळे असले तरी हार न मानता चिकाटीने पुढे जाण्याची जिद्द ठेवण्याचे आवाहन यावेळी आदित्य जाधव याने केले आहे . त्याच्या या यशस्वी व दैदिप्यमान कामगिरीमुळे अंबाजोगाईच्या तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.या सत्कार प्रसंगी आदित्यच्या नातेवाईकासह माजी नगरसेवक दिनेश भराडिया, दत्ता सरवदे, रफिक गवळी, विजय रापतवार, वजीर शेख यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. राजकिशोर मोदी यांनी आदित्यच्या यशाचं कौतुक करत त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# शुक्रवारी जैन मुनींच्या उपस्थितीत भव्य शोभायात्रा

## जैन श्रावक संघाचा चातुर्मास कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ जुलै**

सकल जैन समाजाचे मुनी श्री. जयशेखर महाराज,व मुनी जयघोष महाराज यांच्या आगमना प्रित्यर्थ व चातुर्मास प्रारंभा निमित्त शुक्रवारी सकाळी ११ वाजता सकल जैन समाज, राजस्थानी समाज व शहरवासीयांची भव्य शोभायात्रा शहरातून निघणार आहे.

जैन समाजात चातुर्मास सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो. या वर्षी १० जुलै ते ६ नोव्हेंबर या कालावधीत मध्ये येथील जैन स्थानक येथे हा चातुर्मास

जैन समाजाचे मुनी श्री. जयशेखर महाराज,व मुनी जयघोष महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या दोन्ही मुनींच्या आगमना प्रीत्यर्थ शुक्रवारी सकाळी ११ वाजता भव्य शोभायात्रा शहरातून निघणार आहे.ही शोभायात्रा योगेश्वरी नगरी वाघाळारोड येथून निघणार आहे. छत्रपती चौक,राजीव गांधी चौक, मोंढा रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक, गुरुवार पेठ मार्गे ही शोभायात्रा जैन स्थानकात पोहोचणार आहे.या शोभायात्रेत भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन अंबाजोगाई जैन श्रावक संघाचे अध्यक्ष धनराज सोळंकी, उपाध्यक्ष ऋषभ मुथा,सौरभ कर्णावट, आनंद बडेरा, प्रतीक बोथरा,यश बडेरा, सविता मुथा,सोनाली कर्णावट, सुरेखा मुथा यांनी केले आहे.

# श्री क्षेत्र रामतीर्थ मठ येथे गुरुपौर्णिमे निमित्ताने विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ जुलै**

श्री क्षेत्र रामतीर्थ प,पुज्य महायोगी दादा महाराज खडकीकर मठात, गुरुपौर्णिमा निमित्ताने १० जुलै २०२५ ,रोजी सकाळी सात ते न ऊ,श्री च्या पादुका व समाधीस यजमान श्री प्रकाश सेठ तोतला यांच्या हस्ते अभिषेक होईल,९ ते १२ ,या वेळी साधक, भक्त शिष्य परीवार यांच्या हस्ते श्री च्या पादुका व समाधीस रुद्र आभिषेक होईल, बरा वाजता फुलांची उधळण व व्यास पुजा होईल ,गुरुमंत्र , व आरती,एक ते दोन प्रवचन होईल ,दिढ ते चार भोजन महाप्रसाद होईल,सह वाजता दिप उत्सव होईल ,सात वाजता हारीपाठ होईल ,९ ते ११ ये वेळी भजन किंवा सुंदर कांन्ड होईल ,तरी दादा महाराज यांच्या साधक शिष्य भक्तांनी,परिसरातील सगंळया नी उपस्थित राहवे ,असे आहवान यजमान यांच्या वतीने मठपती श्री विध्यागुरू महाराज खडकीकर ,यांनी केले आहे ,



# गडहिंग्लज प्रशासकीय इमारतीला उपलब्ध करून दिली पशुसंवर्धनची जागा, ना.पंकजा मुंडेंचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.३ जुलै**

गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) येथील उप विभागीय कार्यालयाच्या जागेचा प्रश्न अखेर राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने मार्गी लागला आहे. उप मुख्यमंत्री अजित पवार आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्यात आज झालेल्या बैठकीत पशुसंवर्धन विभागाने त्यांची ७५ आर जमीन यासाठी उपलब्ध करून दिली आहे. दरम्यान या नवीन इमारतीत पशुसंवर्धन विभागाचे देखील स्वतंत्र कार्यालय असणार आहे. दरम्यान मंत्री हसन मुश्रीफ यांनी याबद्दल ना. पंकजाताईंचे आभार मानले आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली व ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत आज विधानभवनातील त्यांच्या समिती कक्षात कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज येथे मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसाठी पशुसंवर्धन विभागाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ,आमदार आशुतोष काळे, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव तथा विकास आयुक्त डॉ. राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, पशुसंवर्धन विभागाचे सचिव रामास्वामी ए., पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी अमोल येडगे, पशुसंवर्धन विभागाचे आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे (व्ही.सी.द्वारे) व अन्य संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# संपूर्ण ग्रामविकास हेच वसंतराव नाईक यांचे स्वप्न-डॉ.हनुमंत सौदागर

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.३ जुलै**

महाराष्ट्रा मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागात वसलेला असून जोपर्यंत गावचा विकास होणार नाही तोपर्यंत महाराष्ट्र विकसित होणार नाही. म्हणूनच संपूर्ण ग्रामविकास हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री जलनायक वसंतराव नाईक यांचे स्वप्न असल्याचे प्रतिपादन डॉ. हनुमंत सौदागर यांनी केले. ते भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालय केज येथे वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यावेळी ते अध्यक्षस्थानावर बोलत होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य विजय शिनगारे, डॉ. नागेश कराळे, ग्रंथपाल अशोक घोडके, श्रीकांत लुंगारे, श्री.सुजित नाईकवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी डॉ. कराळे पुढे बोलताना म्हणाले की, महाराष्ट्राच्या कृषीचा अत्यंत सखोल अभ्यास असणारे आणि त्या दृष्टीने जलसंधारणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे कृतीशील सुधारक म्हणजे वसंतराव नाईक हे असल्याचे सांगितले.यावेळी प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी , विद्यार्थी उपस्थित होते.